## नेमणे आहे
नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड
संपर्क:- ८८९६७११७११

jantaawajnews@gmail.com


# दैनिक जनता आवाज







अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक ११५ मंगळवार, दि. १७ जून २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये


## संमिश्र

### ठाकरे गट स्थानिक स्वबळावर लढणार?

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते भास्कर जाधव यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक महाविकास आघाडीला डावलून स्वबळावर लढवण्याचे संकेत दिलेत. २-४ जागा घेऊन आम्ही आघाडी करणार नाही. सन्मानजनक जागा मिळणार असतील तर आम्ही आघाडीसोबत राहू. अन्यथा हा प्रश्न आमच्यासाठी जर -तरच आहे, असे ते म्हणालेत. भास्कर जाधव मागील ३ दिवसांपासून विदर्भाच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी सोमवारी चंद्रपूर जिल्ह्यातील ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. त्यात त्यांना महाविकास आघाडीत २-४ जागा मिळत असतील तर आघाडी करण्याची काहीही गरज नसल्याचे स्पष्ट केले.

### इस्त्रायलने पुन्हा इराणवर हवाई हल्ले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**तेहरान :** इराण आणि इस्त्रायलमधील संघर्ष चौथ्या दिवशीही सुरू आहे. दरम्यान, सोमवारी इराणने सर्व परदेशी नागरिकांना देश सोडण्याची परवानगी दिली आहे. इराणमध्ये सुमारे १० हजार भारतीय अडकले आहेत. ते आता भारतात परतू शकतील.

### बच्चू कडू बँकेच्या अध्यक्षपदावरून अपात्र

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अमरावती :** प्रहार जनशक्ती संघटनेचे प्रमुख बच्चू कडू यांना अमरावती जिल्हा बँकेच्या अध्यक्ष पदावरून अपात्र ठरवण्यात आले आहे. विभागीय सहनिबंधक यांनी न्यायालयाच्या एक वर्षाच्या शिक्षेचा ठपका ठेवत हा निर्णय घेतला आहे. त्यामुळे बच्चू कडू यांना हा मोठा धक्का असल्याचे बोलले जात आहे.

### वारीला गाडीने जाणाऱ्यांना टोलमाफी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** पंढरपूर आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारकडून वारकऱ्यांसाठी एक दिलासादायक निर्णय घेण्यात आला आहे. वारीला गाडीने जाणाऱ्यांना टोलमाफी देण्यात आली आहे. १८ जूनपासून १० जुलैपर्यंत दरम्यान हा निर्णय लागू असणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने या संदर्भातील अधिकृत आदेश जारी केला असून १० मानाच्या पालख्या जाणाऱ्या मार्गांवर ही टोलमाफी देण्यात आली आहेत.




# महापालिकेसाठी पूर्ण ताकदीने उतरा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कार्यकर्त्यांना आवाहन



जनता आवाज वृत्तसेवा

**वसई : तुमच्या परिवर्तनाची गुरूकिल्ली महानगरपालिकेत आहे. ती जो पर्यंत आपल्याकडे येत नाही, तोपर्यंत आपण कितीही स्वप्न बघितली, तर ती दरवाजाजवळ येऊन थांबणार आहेत, ती पुढे जाऊ शकणार नाही. त्यामुळे आता सर्वांनी जोरात कामाला लागा. महानगरपालिकेच्या दृष्टीने पूर्ण ताकदीने उतरा. तिथे देखील परिवर्तन घडवा. तुम्ही महानगरपालिकेत परिवर्तन घडवल्यानंतर पुढील पाच वर्षांत काय परिवर्तन होते ते बघा, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.**

### ...तसेच महानगरपालिकेतही करावे लागेल

स्नेहा दुबे पंडित यांच्या नेतृत्वात वसई पालघर भागात आपल्याला परिवर्तन घडवायचे आहे. मी असेल, पालकमंत्री गणेश नाईक आम्ही सगळे पूर्ण ताकदीने स्नेहा दुबे पंडित यांच्या पाठीशी उभे आहोत, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. पाच वर्षांमध्ये तुमचा गेल्या वीस वर्षांचा बॅकलॉग भरून काढण्याचा निर्णय आम्ही घेतला असल्याचे त्यांनी आश्वस्त केले. यानंतर कार्यकर्त्यांनी देवा भाऊ जिंदाबादच्या घोषणा दिल्या. त्यावर जिंदाबाद म्हणून चालणार नाही. बॅकलॉग भरायचा असेल, तर जसे परिवर्तन विधानसभेत केले, तसे महानगरपालिकेतही करावे लागेल, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कार्यकर्त्यांना केले.

वसईच्या आमदार स्नेहा दुबे पंडित यांच्या भाजप जनसंपर्क कार्यालयाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काल उद्घाटन पार पडले.

यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी तयारी करण्याचे आवाहन केले. मागील २० वर्षांचा बॅकलॉग भरून काढण्यासाठी विधानसभेत परिवर्तन केले, तसे महापालिकेत करावे लागेल, असे आवाहन देवेंद्र फडणवीस यांनी कार्यकर्त्यांना केले आहे.

पालघर जिल्ह्यात निवडणुका जिंकल्यानंतर प्रथमच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस वसईत दाखल झाले. प्रधानमंत्री धरती आबा जनजातीय ग्राम उत्कर्ष अभियान अंतर्गत धरती आबा लोकसहभाग मोहिमेचा जिल्ह्यात शुभारंभ, शालेय विद्यार्थ्यांचे स्वागत, वाढवण बंदर चर्चा सभा, बांबू लागवड उपक्रम, वसई विरार महापालिकेच्या सर डीएम पेटिट विस्तारित रुग्णालय, बोळींज पोलिस ठाण्याचे एसीपी, डीसीपी कार्यालयाचे ऑनलाइन प्रणाली द्वारे उद्घाटन अशा विविध प्रकारच्या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे पालघर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते.

या दौऱ्यात स्नेहा दुबे पंडित यांच्याही जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन देवेंद्र फडणवीस केले. यावेळी कार्यकर्त्यांशी संवाद साधताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आवाहन केले आहे.

### मुंबई पालिकेसाठी शिवसेनेकडूनही तयारी

दरम्यान, आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना देखील तयारीला लागली आहे. मुंबई महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रविवारी मुंबईतील सेना भवन येथे शाखा प्रमुखांची बैठक पार पडली. येत्या काळात होत असलेल्या निवडणुकीत शिवसेना सोडून गेलेल्या मंडळींना आता त्यांची जागा दाखवून देण्याची वेळ आली आहे. सर्व कार्यकर्त्यांनी अंग झटकून कामाला लागा. त्यासाठी दररोज ३०० घरातील मतदारांची भेट घेण्याचे लक्ष्य ठेवावे. त्यानुसार दिवसभराच्या कामाचे नियोजन करावे.

# रुग्णालयाच्या घटनेतील दोषींवर कारवाई करा : आ. काळे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** कोपरगाव ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी आलेल्या गर्भवती महिलेला पुढील उपचारार्थ दुसऱ्या हॉस्पिटलमध्ये जाण्यासाठी रुग्णवाहिका सेवा देण्यात हलगर्जीपणा करण्यात आला असल्याची माहिती प्रसिद्धी माध्यमातून समोर आली आहे.

कोपरगाव ग्रामीण रुग्णालयातरुग्णसेवेच्या बाबतीत जर असे प्रकार होत असेल तर ते अतिशय गंभीर आहे. त्यामुळे कोपरगाव ग्रामीण रुग्णालयात घडलेल्या घटनेची शहानिशा करून आपल्या कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करा, अशा सूचना आ. आशुतोष काळे यांनी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय घोगरे यांना केल्या आहेत.

कोपरगाव ग्रामीण रुग्णालयात मोफत उपचार होतील याआशेवर आलेल्या गर्भवती महिलेची तपासणी केल्यानंतर त्या महिलेला पुढील उपचार करण्यासाठी लोणी येथील रुग्णालयात जाण्याचा सल्ला देण्यात आला होता. परंतु, त्या महिलेला लोणी येथील रुग्णालयात जाण्यासाठी रुग्णवाहिकेला फोन करण्यास परिचारिकेने असमर्थता दर्शवून मीफोन लावणार नाही, असा पवित्रा घेतला.

रुग्णालयाच्या इतर कर्मचाऱ्यांनी देखील उडवा उडवीची उत्तरे देवून रुग्णवाहिका उपलब्ध असतांना देखील त्या गर्भवती महिलेला वेळेत रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात कोपरगाव ग्रामीण रुग्णालय प्रशासनाकडून दिरंगाई करण्यात आली. त्यामुळे अंत्यवस्थ असणाऱ्या त्या गर्भवती महिलेला व तिच्या पतीला मोठा मनस्ताप सहन करावा लागला, अशा आशयाच्या बातम्या विविध प्रसिद्धी माध्यमांनी प्रसिद्ध केल्या होत्या. त्या पान ४



### आ. काळेंनी दिली प्रशासनाला तंबी

कोपरगाव ग्रामीण रुग्णालय प्रशासनाने आपल्या कार्यपद्धतीत सुधारणा करावी. कोपरगाव ग्रामीण रुग्णालयाच्या बाबतीत प्रसिद्ध झालेल्या बातम्यातून रुग्णांना आरोग्य सेवा देतांना ग्रामीण रुग्णालय प्रशासनाची उदासीनता दिसून येत आहे. त्यामुळे यापुढील काळात नागरीकांच्या तक्रारी येणार नाही याची काळजी घ्यावी, अन्यथा त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील, अशी तंबी आ. काळे यांनी कोपरगाव ग्रामीण रुग्णालय प्रशासनाला दिली आहे.

# कोल्हार न्यू इंग्लिश स्कूलमध्ये नवागतांचे स्वागत

## विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके वाटप; मान्यवरांकडून नवागतांवर शुभेच्छांचा वर्षाव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार :** राहाता तालुक्यातील कोल्हार बुद्रुक येथील रयत शिक्षण संस्थेचे, न्यू इंग्लिश स्कूल व कनिष्ठ कला महाविद्यालयात काल दि. १६ जून रोजी नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे तसेच इयत्ता पाचवी ते दहावीच्या सर्व उपस्थित विद्यार्थ्यांचे स्वागत करून मोफत पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आले.



नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प देऊन, लेझीम व झांज पथकासह वाजत गाजत मोठ्या उत्साहात मिरवणूक काढण्यात आली. तसेच नवीन विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आले आहे.

स्व. शंकर नाना खर्डे पाटील प्रतिष्ठानचे अध्यक्ष अजित मोरे यांच्या हस्ते व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सर्व पाचवीच्या विद्यार्थ्यांना वह्यांचे वाटप करण्यात आले.

यावेळी सर्व विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजन देण्यात आले होते. कोल्हार बु. येथील सुप्रसिद्ध बालरोग तज्ज्ञ डॉ. सुनील पाटील खर्डे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी स्थानिक स्कुल कमिटी सदस्य पांडुरंग पाटील देवकर, संजय शिंगवी, शिरसाठ दादा, नानासाहेब कडसकर, संदीप करकुटे, सुजित राऊत, संपतराव कापसे, वसंतराव खर्डे, शिवधन पतसंस्थेचे शिंदे, श्री. निबे, श्री. कडू, समीर शेख, आदिल सय्यद, किरण पाटील खर्डे, माजी मुख्याध्यापक सोनवणे, प्रा. नवाळे, पान ४

# अहमदनगरऐवजी अहिल्यानगर करा

## डॉ. उषाताई तनपुरेंची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी :** अहमदनगरचे नाव अहिल्यानगर झाले आहे आणि आधारकार्डवर बहुतांश विद्यार्थी पालकांचे आधार कार्डवर अजूनही अहमदनगर नाव असल्याने अनेक पालकांना आपल्या पाल्याना प्रवेश घेण्यासाठी अडथळा निर्माण होत असून याबाबत जिल्हाधिकारी यांनी या बाबीकडे लक्ष घालून आपल्या पाल्यास शाळा प्रवेश घेताना येणारी अडचण तातडीने मार्गी लावावी, अशी मागणी डॉ. बाबुराव बापूजी ग्रामीण शिक्षण संस्थेच्या सचिव डॉ. उषाताई तनपुरे यांनी केली आहे.



### अद्याप आधारकार्डवर दुरूस्ती नाही : तनपुरे

केवायसीची पूर्तता करताना सर्व ठिकाणी अहमदनगरचे नाव अहिल्यानगर झाले आहे आणि आधारकार्डवर बहुतांश विद्यार्थी पालकांचे आधारकार्डवर अजूनही अहमदनगर नाव असल्याने प्रवेश प्रक्रियेसाठी अडथळा निर्माण होत आहे. गेल्या दोन महिन्यापासून शासन दरबारी जरी जिल्ह्याचे नाव अहिल्यानगर झाले असले, तरी अद्याप आधारकार्डच्या सॉफ्टवेअरमध्ये ही दुरुस्ती झालेली नसल्याचे समजते. त्यामुळे यासंबंधी अनेक विद्यार्थी, पालक व संस्था चालकांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे ही अडचण कळवली असल्याचे डॉ. उषाताई तनपुरे यांनी सांगितले.

काल राज्यात सर्वत्र शाळा सुरु झाल्या असून प्रत्येक शाळेत नवीन विद्यार्थ्यांचे स्वागताचे कार्यक्रम सुरु असताना राहुरी येथील एका कार्यक्रमात अनेक पालकांनी आपल्या मुलां-मुलींचे प्रवेश घेताना येणारी अडचण त्यांचे लक्षात आणून दिली व त्यास संबंधित शाळेच्या मुख्याध्यापक यांनीही दुजोरा दिल्याने मुलांच्या पान ४

# मंजूर झालेले अभियायांत्रिकी महाविद्यालय नगर शहरात करा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** अहिल्यानगर जिल्हयासाठी मंजूर झालेले अभियायांत्रिकी महाविद्यालय अहिल्यानगर शहरात व्हावे, अशी मागणी अहिल्यानगर जिल्हा भाजपाचे माजी जिल्हाधक्ष प्रा. भानुदास बेरड यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

महाराष्ट्राची उपराजधानी असलेल्या नागपूर येथे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची अहिल्यानगर भाजपाच्या शिष्टमंडळाने भेट घेतली व अहिल्यानगरला शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व राज्य

# राज्यभरात शाळांमध्ये प्रवेशोत्सव साजरा

## अनेक शाळांमध्ये रांगोळी काढून गोड पदार्थांसह गुलाब पुष्प देवून नवागतांचे केले स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** विद्यार्थ्यांचा शाळेतील पहिला दिवस दडपणमुक्त व आनंददायी असावा, या उद्देशाने शहरातील सर्व शाळांमध्ये प्रवोशोत्सव साजरा करण्यात आला.

शाळेच्या प्रवेशद्वारात रांगोळ्या काढून, गोड पदार्थ, गुलाबपुष्प देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. शैक्षणिक वर्षाची सुरुवात काल सोमवारपासून झाली आहे. शाळा सुरू होण्याच्या पहिल्या दिवशी शाळा प्रवेशोत्सवाच्या माध्यमातून मान्यवरांच्या उपस्थितीत सर्व नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. शाळेची गुणवत्ता वृद्धिंगत करण्यासाठी व मुलांची उपस्थिती वाढविण्याकरिता शालेय शिक्षण विभागामार्फत राज्यभर शाळा प्रवेशोत्सव उपक्रम साजरा करण्यात आला.



शाळा प्रवशोत्सव या उपक्रमांतर्गत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सर्व मंत्री, राज्यमंत्री तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी, सर्व अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव यांना नजीकच्या शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळेत भेटी देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले. यावेळी विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता, मोफत पाठ्यपुस्तके, मोफत शालेय गणवेश व इतर सोयीसुविधांचा आढावा घेण्यात आला.

शाळेतील भौतिक सुविधांचा दर्जा, विद्यार्थ्यांच्या खेळांच्या सुविधांचा दर्जा, शाळेतील पूरक व्यवस्था, शालेय व्यवस्थेचा दर्जा, विद्यार्थ्यांच्या स्वच्छतेच्या सवयी, पंतप्रधान पोषणशक्ती योजनेंतर्गत देण्यात येणारा पोषण आहार आदी विविध विषयांबद्दल मान्यवरांमार्फत मार्गदर्शन करण्यात आले.

### स्वागताने विद्यार्थी भारावले

शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे आगळ्या वेगळ्या पध्दतीने स्वागत करण्यात आले. या स्वागताने विद्यार्थी भारावून गेले होते. मुलांना खायला मिठाई मिळाल्याने त्यांचे चेहरे आनंदी झाले होते. पालकही मुलांचा आनंद पाहून समाधानी झाले होते.

### स्कूल बसच्या हॉर्न वाजले

मुलांना शाळेत नेण्यासाठी दीड महिन्यानंतर स्कूलबस घरांपुढे आल्या. मुलांना नेण्यासाठी हॉर्न वाजविले जात होते. स्कूल बसच्या हॉर्नने शहरासह ग्रामीण भागात दणाणून गेला होता.

### पालक व्यस्त

घराघरात सकाळपासून आवरण्याची मुलांसह त्यांच्या पालकांची लगबग सुरू होती. मुलांना उठवण्यापासून ते त्यांचे आवरून त्यांना शाळेत सोडण्यापर्यंत पालक व्यस्त असल्याचे चित्र दिसून येत होते.

### बाजारपेठेत गर्दी कायम

शाळा सुरू झाल्याने बाजारपेठेतील उलाढाल वाढली आहे. शाळा सुरू होण्याच्या अगोदर आठ दिवस वह्या व स्टेशनरी खरेदीसाठी पालकांनी कापड बाजारात गर्दी केली होती. ही गर्दी नगर शहराबरोबरच ग्रामीण भागात मोठी झाली होती. यामुळे जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात उलाढाल झाली.

# अहिल्यानगर-पुणे महामार्गावर भीषण अपघात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** नगर-पुणे महामार्गावर चास-कामरगाव घाटा दरम्यान मालवाहू टेम्पो व कारचा भीषण अपघात झाला. टेम्पो समोरून येवून कार वर आदळला. या अपघातात कारचालक गंभीर जखमी झाला असून, त्यांच्यावर शिरूरच्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दुभाजक तोडून टेम्पो कार वर आदळल्याने हा भीषण अपघात घडला. याबाबत पोलिसांकडून समजलेली माहिती अशी की, पुण्याहून नगरच्या दिशेने येणारा मालवाहू टेम्पो (एमएच १२ व्हीएफ ८६४९) हा कामरगावहून पुढे चास गावालगच्या उतारावरच्या वळणावर येत असताना नगरहून पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या कारने (एमएच १४ एफजी ९९२८) कार आणि टेम्पोमध्ये अपघात घडला. यातील जखमी चालकाची प्रकृती ठीक आहे.

# प्रवरा औषधनिर्माण महाविद्यालयात वृक्षारोपण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** राजकारण नव्हे तर समाजकारण यासाठी जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे काम करतात. त्यांचा वाढदिवस लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील प्रवरा औषध निर्माण शास्त्र महाविद्यालयांमध्ये पर्यावरणाचा संवर्धन आणि सामाजिक उपक्रमातून संपन्न झाला.

प्रवरा महाविद्यालयामध्ये वृक्षारोपण या सह कार्यरत असणाऱ्या चतुर्थ श्रेणी महिला कर्मचाऱ्यांना साडी वाटप करण्यात आले. प्राचार्य डॉ. संजय भवर यांनी मंत्री



विखे पाटील यांच्या कार्याचा आढावा घेत असताना त्यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रम म्हणून साजरा होत साजरा होत असताना आपणही सामाजिक कार्यातून समाजासाठी कार्यरत राहावे, असे आवाहन केले.

यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. मंगाथायारु के डॉ. संजय भवर, डॉ. राहुल गोडगे, डॉ. सुहास सिद्धेश्वर, डॉ. सोमेश्वर मनकर, डॉ. संतोष दिघे, डॉ. आरशु पटेल, डॉ. रोहित भोर, अनिल आहेर, रमाकांत विखे, डॉ. संजय कहार व महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# आ. काळेंनी जेऊर कुंभारीकरांना दिलेला शब्द पूर्ण

## जेऊर कुंभारी गावातील देवकर वस्तीला मिळाले नवीन रोहित्र; नागरिकांत आनंदाचे वातावरण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** कोपरगाव तालुक्यातील जेऊर कुंभारी येथे अनेक वर्षांपासून विजेच्या अडचणींना तोंड देणाऱ्या देवकर वस्तीतील शेतकऱ्यांची प्रतीक्षा अखेर संपली आहे. आ. आशुतोष काळे यांनी शेतकऱ्यांना दिलेला शब्द अखेर पूर्णत्वास नेल्याने सोळके वस्ती येथे नवीन रोहित्र बसवण्यात आली असून त्यामुळे देवकर वस्ती व परिसरातील शेतकऱ्यांचा विजेचा ताण कमी होणार आहे.

तसेच देवकर वस्तीवरील एकाच रोहित्रावर अनेक विद्युत मोटारी कार्यरत असल्यामुळे विजेचा भार सातत्याने सदरच्या डीपीवर वाढत होता. परिणामी,



वारंवार विद्युत पुरवठा खंडित होणे तसेच रोहित्र जळणे डीपी जळाल्यानंतर दुरुस्तीसाठी दहा-पंधरा दिवस लागत असे, अशा प्रकारच्या विविध अडचणींमुळे तेथील स्थानिक शेतकरी मोठे त्रस्त झाले होते.

शेतीच्या हंगामात पिकांना पाणी देता न येणे हेसुद्धा मोठं संकट ठरत होतं. या समस्येच्या समाधानासाठी स्थानिक गावकरी व आमदार आशुतोष काळे मित्र मंडळाचे कार्यकर्ते यांनी आ. काळे यांची भेट घेऊन महावितरणच्या वारंवार होणाऱ्या विद्युत पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण व वारंवार डीपी जळाल्याने शेतकऱ्यांची होणारे हाल याचा संपूर्ण लेखाजोखा मांडला सदर मागणीची तात्काळ दखल घेत आ. काळे यांनी नवीन रोहित्र लवकरच उपलब्ध करून दिले जाईल, अशी हमी दिली व अखेर त्यांनी दिलेला शब्द अखेर पूर्ण करत, १५ जून २०२५ रोजी सोळके वस्ती येथे नवीन डीपी बसवण्यात आली.

याप्रसंगी आशोक राऊत, शामराव वक्ते, लक्ष्मण वक्ते, गोकुळ जावळे, बाळासाहेब देवकर, दादासाहेब चव्हाण, सतिश गोसावी, निराभाऊ जावळे, बाळासाहेब सोळके, दौलत सोळके, गंगाराम सोळके पक्का वक्ते, सुनिल वक्ते, राजेंद्र वक्ते, संजय वक्ते, आप्पासाहेब सोळके, पोपट सोळके, किसन सोळके द्वारकानाथ देवकर, बारकु देवकर, दिपक गिरमे, रावसाहेब गोसावी, पाराजी वक्ते, साईराज मेहेत्रे, प्रसाद जगताप आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बाळासाहेब देवकर यांनी केले. तर आभार भानुदास वक्ते यांनी मानले.

**आ. काळे मित्र मंडळाच्या कार्यकर्त्यांचा सन्मान**

आ. आशुतोष काळे मित्र मंडळाचे कार्यकर्ते रामनाथ आव्हाड, केशव आबनावे, पाटिलबा वक्ते, दिलीपराव शिंदे, बापुराव वक्ते, कल्याणराव गुरसळ, धोंडीराम वक्ते, महेंद्र वक्ते, भाऊसाहेब वक्ते, किरण वक्ते, विरू शिंदे, भानुदास वक्ते, राजेंद्र गिरमे, पोपट शिंदे, संजय चव्हाण, राजेंद्र चव्हाण या प्रमुख कार्यकर्त्यांचा जेऊर कुंभारी गावाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

# नागरिकांनी एक दिवस कोरडा दिवस पाळावा

## आयुक्त यशवंत डांगे; मनपाकडून दर रविवारी डेंग्यूमुक्त अहिल्यानगर अभियान सुरु

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** महानगरपालिकेच्या वतीने अहिल्यानगर शहर डेंग्यूमुक्त करण्यासाठी उपाययोजना सुरू आहेत. त्याचाच भाग म्हणून नागरिकांच्या सहभागातून डेंगू मुक्त अहिल्यानगर अभियान दर रविवारी राबविण्यात येत आहे. डास आळींची उत्पत्ती रोखली जावी, यासाठी आठवड्यातून एक दिवस नागरिकांनी 'कोरडा दिवस पाळावा' व या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले आहे.

यावर्षी होणाऱ्या



अभियानात आरोग्य विभागाचे १२ वैद्यकीय अधिकारी, १ साथरोग अधिकारी, १५ स्टाफ नर्स, ३५ एएनएम, ६ एमपीडब्ल्यू, १६ मलेरिया कर्मचारी, २५ आशा स्वयंसेविका असे ११० कर्मचारी अभियानाच्या माध्यमातून २० पथकांद्वारे १००० घरांतील ५००० लोकसंख्येचे सर्व्हेक्षण करणार आहेत. रविवार १५ जून पासून हे अभियान सुरू करण्यात आले आहे.

डेंग्यू पासून सावध राहण्यासाठी, डेंग्यूची डास अळीची उत्पत्ती रोखण्यासाठी जनजागृती करणे, डास अळी नियंत्रण कार्यक्रम, पाणीसाठ्यांची तपासणी, पाणी साठवले जाणारे अथवा दूषित पाणी साठलेले कंटेनर शोधून रिकामी करणे, पाण्यात अळीनाशक ॲबेट टाकणे, डास नाशक स्प्रेईंग करणे, डास उत्पत्ती प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे, नागरिकांमध्ये जनजागृतीकरिता माहितीपत्रके वाटप करणे आदी कार्यक्रम व उपक्रम या अभियानातून होणार आहेत.

> नागरिकांनीही या अभियानात सहभागी व्हावे. एक दिवस कोरडा दिवस पाळावा व स्वतःच्या घराची तपासणी करून साचाललले पाणी काढून टाकावे.
>
> **– यशवंत डांगे, आयुक्त**

# अन्नदान व वृक्षारोपणाने मंत्री विखेंचा वाढदिवस साजरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** बेलापूर परिसरातील गोखलेवाडी या ठिकाणच्या श्री साई विठ्ठल अनाथ आश्रम येथे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. परंतु विमान अपघात दुर्दैवी घटनेमुळे ना. विखे पाटील यांच्या सूचनेनुसार वाढदिवस न साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

तसेच त्यांनी पदाधिकारी कार्यकर्ते यांना सूचनाही या पद्धतीने सुचविण्यात आल्या होत्या. कुठल्याही प्रकारचा मोठा जल्लोष न करता कार्यक्रम न करण्याचा निर्णय घेतल्यामुळे संपूर्ण जिल्ह्यामध्ये ठिकठिकाणी अनाथ आश्रम



या ठिकाणी अन्नदान, रक्तदान, वृक्षारोपण गरजू विद्यार्थ्यांना गणवेश, शालेय विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात यावे, अशा सूचना ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी जाहीरपणे आदेश दिल्याने श्रीरामपूर येथील अनाथ आश्रम या ठिकाणी अन्नदान व वृक्षारोपण करण्यात आले.

याप्रसंगी भाजपाचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, तालुकाध्यक्ष बाबासाहेब चिडे, शहराध्यक्ष जितेंद्र छाजेड, संजय फंड, नगरसेवक आशिष धनवटे, संजय गांगड, बंडूकुमार शिंदे यासह भाजपा पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन जितेंद्र छाजेड व भाजपा पदाधिकारी यांनी केले. यावेळी आश्रमातील बालगोपाल लहान मुलांशी संवाद साधण्यात आला. तर उपस्थित सर्व मान्यवरांचे कृष्णानंद महाराज तसेच ज्ञानेश्वर महाराज आढाव यांनी आभार मानले.

# विद्यार्थ्यांनी आवडीच्या विषयांमध्ये करिअर करावे

## आ. संग्राम जगताप; बोरुडेमळा येथे बोरुडे यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** विद्यार्थी हा उद्याच्या भारताचे उज्वल भविष्य असून त्यांना योग्य मार्गदर्शनाची व संस्काराची खरी गरज आहे. गेल्या १५ वर्षांपासून गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांच्या पाठीवर शब्बासकीची थाप देऊन प्रोत्साहन देण्याचे काम केले. जाते ही बाब कौतुकास्पद आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या विषयामध्ये करिअर



करावे, असे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले.

बोरुडे मळा येथे माजी उपमहापौर अनिल बोरुडे यांच्या वतीने १०, १२ वीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न झाला.

यावेळी आ. संग्राम जगताप, मा. महापौर बाबासाहेब वाकळे, मा. उपमहापौर अनिल बोरुडे, मा. सभापती पुष्पाताई बोरुडे, मा. स्थायी समिती सभापती गणेश कवडे, मा. नगरसेवक धनंजय जाधव, निखिल वारे, नितीन पुंड, मुकुल गंधे, उद्योजक प्रदीप नातू, भीमाशंकर लांडे, पारुलाथ ढोकळे, महेश लोंढे, धीरज बिडवे, मनीष आहुजा, डॉ. शंकर शेळके, बाबासाहेब शिंदे, अविनाश जाधव आदी उपस्थित होते.

उद्योजक प्रदीप नातू, मा. उपमहापौर अनिल बोरुडे, मा. सभापती पुष्पाताई बोरुडे, भीमाशंकर लांडे, मा. सभापती गणेश कवडे, मा. नगरसेवक धनंजय जाधव, पारुनाथ ढोकळे, नितीन पुंड, मनीष आहुजा आदींची भाषणे झाली. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उद्धव कालापाड यांनी केले.

> विद्यार्थ्यांनी शालेय शिक्षणाबरोबर आपल्या आवडीच्या खेळाचे धडे घ्यावे आत क्रीरीडा क्षेत्रात देखील करिअर करण्याच्या विविध संधी उपलब्ध आहे. आई वडील आपल्या मुलांना घडविण्यासाठी खूप कष्ट करत असतात. त्यांच्या कष्टाचे चीज करण्याचे काम पाल्याने करावे. गुरुजनांचा आदर, मान, सन्मान राखावा आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगामध्ये शिक्षणाबरोबर आपल्या संस्कृतीचे जतन करण्याचे काम विद्यार्थ्यांनी करावे.
>
> **– बाबासाहेब वाकळे, माजी महापौर**

# मंत्री विखेंचा वाढदिवस सामाजिक कार्यक्रमांनी साजरा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव :** अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शेवगावमध्ये भाजपाचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस अरुण मुंढे यांच्याकडून उचल फाउंडेशनमधील अनाथ निराधार व गरजू मुलांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

तसेच आखेगांव रोड येथे वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी विविध सामाजिक कार्याने ना. विखे पाटील यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला.

# लेखी आश्वासनानंतर शेतकऱ्यांचे उपोषण स्थगित

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** पिचडगाव येथील शेतकऱ्यांच्या जमिनीवर वनविभागाने अनधिकृतपणे लावलेली सुमारे २१ हजार झाडे त्वरित काढून टाकावीत, या मागणीसाठी नेवासा तहसील कार्यालयासमोर सुरू असलेले शेतकऱ्यांचे उपोषण अखेर चौथ्या दिवशी लेखी आश्वासनानंतर स्थगित करण्यात आले.

पिचडगाव (गट नंबर-३४, सर्व्हे नंबर-२१) मधील शेतजमिनी शेतकऱ्यांच्या नावावर असतानाही त्यांना विश्वासात न घेता वनविभागाने झाडे लावली होती. यामुळे शेतकऱ्यांनी १० जूनपासून तहसील कार्यालयासमोर उपोषण सुरू केले होते. प्रहार संघटनेचे युवा जिल्हाध्यक्ष ॲड. पांडुरंग औताडे यांनी या उपोषणाला मोलाचे समर्थन दिले.

दरम्यान, पोलीस उपअधीक्षक संतोष खाडे, नायब तहसीलदार चांगदेव बोरुडे, महसूल आणि वनविभागाचे अधिकारी यांच्यासह अनेकांनी भेटी देऊन समुपदेशनाचा प्रयत्न केला. मात्र



शेतकरी आपल्या मागणीवर ठाम राहिले. नायब तहसीलदार बोरुडे यांनी जमिनीची मोजणी भूमापन खात्याद्वारे करून, वनाधिकारी संबंधित अधिकारी पोलीस बंदोबस्तात महसूल कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत योग्य तो न्याय देण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले. या उपोषणात राजेंद्र वाघ, गोरक्षनाथ उपळकर, दानियल साळवे, कारभारी चौरे, फ्रुलाबाई उपळकर, शिवराम साळवे, अशोक पवार, सुनील गरुड, मोनिका नरोडे, संजय धोगडे आदी शेतकऱ्यांनी सहभाग घेतला होता. उपोषणस्थळी शेतकऱ्यांना लिंबू पाणी देऊन उपोषणाची सांगता करण्यात आली.

> चार दिवसांच्या संघर्षानंतर आम्हाला लेखी आश्वासन मिळाले आहे. आता आमच्या जमिनी मोकळ्या होतील, असा विश्वास वाटतो.
>
> **–राजेंद्र वाघ**

> विशेष म्हणजे या ठिकाणी गाव पुढाऱ्यांनी मतांसाठी काहींना छप्पर बांधून दिले आणि सदरचे शेतकरी शेती करत असताना मुद्दाम त्यांच्या शेतात जनावरे घालून त्रास दिला जातो. त्यामुळे उपोषणालाचा मार्ग शेतकऱ्यांनी स्वीकारला होता.

# 'नागवडे'च्या तज्ज्ञ संचालकपदी कातोरे व खरात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी



साखर कारखान्याच्या तज्ज्ञ संचालकपदी उक्कडगाव येथील प्रगतशील शेतकरी व तालुका दूध संघाचे माजी संचालक दत्तात्रय कुंडलिक कातोरे तसेच गार खरातवाडी येथील ज्ञानदेव गना खरात यांची निवड करण्यात आली. कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संचालक मंडळ सभेत दत्तात्रय कातोरे व ज्ञानदेव खरात यांची निवड करण्यात आली.

# माजी मंत्री थोरातांचाच म्हाळुंगी पुलासाठी पाठपुरावा

## सोमेश्वर दिवटे; भर उन्हाळ्यातही संगमनेरकरांना मिळाले मुबलक पाणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** म्हाळुंगी नदीला आलेल्या पुरामुळे २०२२ मध्ये साईनगर कडे जाणारा पूल खचला होता. हा पूल तातडीने व्हावा याकरता माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करून साडेचार कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून घेतला होता मात्र राज्यात सत्तांतर झाले आणि फक्त राजकारणासाठी या पूलाचे काम सत्ताधाऱ्यांनी रखडवले होते. आता पूल झाल्याने समाधान असून या पुलाचे सर्व श्रेय माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचेच असल्याचे शहराध्यक्ष सोमेश्वर दिवटे यांनी म्हटले आहे.

दिवटे यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकार म्हटले आहे की, २०२२ मध्ये म्हाळुंगी नदीला आलेल्या पुलामुळे तो पूल घातला होता. यानंतर माजी मंत्री बाळासाहेब थोरात व तत्कालीन नगराध्यक्षा दुर्गाताई तांबे यांनी पुलाची पाहणी करून सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात



सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून नागरिकांच्या सोयीसाठी तात्पुरता पूल उभा केला होता. साईनगर, घोडेकर मळा व गंगामाई घाटाकडे जाणारा पूल भक्कम व्हावा याकरता लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी तत्कालीन मुख्यमंत्री यांच्याकडे पाठपुरावा करून साडेचार कोटी रुपयांचा निधी मंजूर करून घेतला होता.

जनतेच्या विकासासाठी राजकारण करायचे असते हा मंत्र थोरात यांनी सातत्याने जपला आहे. माजी मंत्री थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर हे शहर हायटेक व वैभवशाली असून संगमनेरमध्ये अत्यंत चांगल्या सुविधा नागरिकांना पुरवल्या जात आहे. याचबरोबर निळवंडे धरणातून थेट पाईपलाईन योजना असल्याने भर उन्हाळ्यात सुद्धा संगमनेरकरांना मुबलक पाणी मिळत होते.

संगमनेर हायटेक बस स्थानक, नगरपालिका, न्यायालय इमारत, प्रांत कार्यालय, तहसील कार्यालय, पंचायत समिती, शासकीय विश्रामगृह, कवी अनंत फंदी खुले नाट्यगृह, याचबरोबर प्रवरा नदीवर चार पूल आणि बायपास अशा मोठ्या विकासाच्या योजना राबवल्या आहेत. या परिसरातील स्थानिक नागरिकांनी या पुलाच्या कामासाठी पाठपुरावा केल्याबद्दल माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी आ. डॉ. सुधीर तांबे व आ. सत्यजित तांबे यांचे अभिनंदन केले आहे.

> साईनगर परिसरातील नागरिकांना व विद्यार्थ्यांना सोयी करता माळुंगी पूल लवकरात लवकर व्हावा याकरता माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी पाठपुरावा सुरूच ठेवला होता. पूल सुरू झाल्याने आनंद असून या पूल उभारणीचे श्रेय हे माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचेच आहे.
>
> **– सोमेश्वर दिवटे**

# शेती क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञान अवगत करा

## डॉ. सुप्रिया ढोकणे; मंत्री विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त शेतकरी परिसंवाद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** शेती क्षेत्रात नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून शेतकऱ्यांनी पुढे जाण्याची गरज आहे. कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून मिळणाऱ्या तंत्रज्ञानाचा उपयोग आपल्या प्रत्यक्ष शेतात करून आपले उत्पादन वाढीसाठी प्रयत्न करावेत. केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांचा फायदा घेऊन शेतकऱ्यांनी पुढे जावे यासाठी कृषी विज्ञान केंद्र आपल्या सोबत असल्याचे प्रतिपादन पायरेन्स संस्थेच्या विश्वस्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रिया ढोकणे पाटील यांनी केले.

संस्थेचे अध्यक्ष आणि जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत भारतीय कृषी अनुसंधान परिषद नवी दिल्ली आणि कृषी विज्ञान केंद्र बाभळेश्वर यांच्या संयुक्त विद्यमाने तेलबिया उत्पादन वाढीसाठी आयोजित तेलबिया प्रात्यक्षिक प्रकल्पाच्या शुभारंभ शेतकरी परिसंवादात डॉ. ढोकणे बोलत होत्या. यावेळी संस्थेचे पायरेन्सचे सचिव डॉ. निलेश बनकर, कृषी विज्ञान केंद्राचे संचालक डॉ. उत्तमराव कदम, केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख, शांताराम सोनवणे, भरत दवंगे, डॉ. विलास घुले डॉ. विठ्ठल विखे, संज्जला लांडगे, डॉ. प्रियंका खर्डे, कैलास लोंढे आदींसह गणेश परिसरातील अस्तगाव, डोऱ्हाळे, कनकुरी, पिंपळस, दहेगाव कोऱ्हाळे येथील शेतकरी उपस्थित होते.

डॉ. ढोकणे पाटील म्हणाल्या, मंत्री विखे पाटील यांच्या माध्यमातून आज राज्यासह अहिल्यानगर मध्ये सर्वांगीण विकास होत आहे. या विकासाच्या माध्यमातून राज्य पुढे जात आहेत. त्यांच्यामुळे आज चाळीस वर्षानंतर निळवंडाचे पाणी हे लाभ क्षेत्रात आले आहे. यामुळे जिरायत भाग बागायत होणार आहे. आता कृषी विज्ञान केंद्राची जबाबदारी अजून वाढली आहे. शेतकऱ्यांना नवनवीन तंत्रज्ञान देऊन त्यांचे शेती उत्पादन वाढवण्यासाठी कृषी विज्ञान केंद्राला प्रयत्न करावा. शेतकऱ्यांनी नवीन तंत्रज्ञान अवगत करत असताना कृषी विज्ञान केंद्रातील शास्त्र शास्त्रज्ञांच्या सल्ल्यानुसार शेती व्यवसायाला चालना द्यावी असे सांगून केंद्रामार्फत सुरू असलेल्या विविध सेवा सुविधांचा शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा असे असेही त्यांनी सांगितले.

भरत दंवगे यांनी शेतकऱ्यांना सोयाबीन पीक उत्पादन तंत्रज्ञान त्यामध्ये बीज प्रक्रिया, लागवड पद्धती लागवडीचे अंतर खतांचे व्यवस्थापन तन नियंत्रण कीड रोगव्य नियंत्रण यावर मार्गदर्शन केले. तर शैलेश देशमुख यांनी सोयाबीन लागवड पद्धत, लागवड अंतर, बीज प्रक्रिया, उत्पादन वाढीसाठी आवश्यक बाबीं आणि सुधारित फुले संगम या वाणाची माहिती दिली.




# जामखेडमध्ये दुचाकीची केली चोरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** जामखेड येथे १५ जून रोजी संध्याकाळी बजाज कंपनीची पल्सर मोटरसायकल चोरी गेल्याची घटना घडली असून याबाबत विनोद बबन हजारे यांनी जामखेड पोलीस स्टेशनला दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, मी जामखेड येथे करमाळा रोड द्रोणागिरी कॉलनीमध्ये राहत असून माझी समर्थ सेल्स नावाची कोल्डिंग एजन्सी आहे. त्यासमोर माझ्या कामगाराने बजाज मोटरसायकल-१६-१०४९ दिनांक १५ रोजी संध्याकाळी लावली होती. त्यानंतर त्याने मला फोन करून सांगितले की मी एजन्सी समोर मोटरसायकल लावून जेवण करून झोपी गेलो होतो, परंतु दुसऱ्या दिवशी मी सकाळी दहा वाजता आलो असता मला एजन्सी समोर मोटरसायकल दिसून आली नाही असे त्याने मला सांगितले.

त्यानंतर मी व माझे नातेवाईक अतुल खेत्रे,अंगद बोराटे व राजू भुजबळ असे त्या ठिकाणी गेलो. नंतर आम्ही जामखेड शहरात व आसपासच्या ठिकाणी मोटरसायकलचा शोध घेतला परंतु मला माझी मोटरसायकल मिळाली नाही. त्यामुळे माझी खात्री झाली की माझी बजाज कंपनीची पल्सर मोटरसायकल ही कोणीतरी अज्ञात चोरट्याने स्वतःच्या फायद्या करिता चोरून नेली आहे, अशी फिर्याद विनोद हजारे यांनी जामखेड पोलीस स्टेशनला दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

# ना. विखे पाटील प्रश्न सोडविणारे नेते: पटारे

## तालुक्यातील नायगाव येथे विविध उपक्रमांनी वाढदिवस साजरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** तालुक्यातील प्रश्न सोडवण्यासाठी आपण काम करत आहोत कोणत्या हि पदाकरीता आपण काम करत नाही. नामदार राधाकृष्ण विखे पाटील हे केवळ राजकारणी नसुन मिळालेल्या सत्तेच्या माध्यमातून गोरगरीब जनतेचे प्रश्न सोडवत माणुसकीचा अनोखा आदर्श त्यांच्या कामातून दिसून येतो. त्यांच्यासारखे राज्यस्तरीय नेतृत्व आपल्याला लाभले हे आपले भाग्य असल्याचे प्रतिपादन माजी सभापती दीपक पटारे यांनी केले.

ना. विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त काल जनसेवा मंडळ, नायगाव यांच्यावतीने सामाजिक भान जागृत करणारे विविध उपक्रम पुण्यश्लोक ओहिल्याबाई हौळकर माध्यमिक विद्यालय, नायगाव, ता.श्रारामपूर येथे राबवण्यात आले. त्याप्रसंगी पटारे बोलत होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाळकृष्ण भोसले होते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्य, खाऊ वाटप करण्यात आले, तर परिसरात वृक्षारोपणाचा उपक्रम पार पडला. याशिवाय, दहावीच्या परीक्षेत प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार करण्यात येऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.

पटारे म्हणाले की, विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मी केवळ पदासाठी नाही, तर गावागावच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी आणि विकासाला गती देण्यासाठी काम करत आहे. त्यांच्या प्रेरणेने शैक्षणिक सुविधा, डिजिटल साधने, आणि विद्यार्थ्यांना आधार देण्याचे अनेक उपक्रम हाती घेतले. यावेळी शंकरराव मुठे, मनोज भैय्या भिसे, दत्ता जाधव, महेंद्र पटारे, असिफ पोपटिया आदी मान्यवर उपस्थित होते. काल श्रीराम पूरू तालुक्यातील अनेक प्रमुख गावांमध्ये ना.राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात आले. त्यात वह्या-पुस्तकांचे वाटप, वृक्षारोपण, सायकलींचे वाटप आदींचा समावेश होता.

# माणिकदौंडी येथील शाळा शिक्षकांअभावी बंद

## जांभळवाडी शाळेचे दहा महिन्यांनी उघडले कुलूप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** राज्यभरात १६ जून रोजी नवीन शैक्षणिक वर्षाला सुरुवात झाली. पाथर्डी तालुक्यातही विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. मात्र, काही ठिकाणी गोंधळाचे चित्र दिसून आले. तालुक्यातील माणिकदौंडी येथील कोकिसपीर तांडा जिल्हा परिषद शाळा पहिल्याच दिवशी शिक्षकांविना बंद राहिली. या शाळेतील दोन्ही शिक्षक अनुपस्थित होते. एक महिला शिक्षिका वैयक्तिक दुःखद प्रसंगामुळे उशिरा पोहोचल्या, तर दुसरे शिक्षक आलेच नाहीत.



त्यामुळे दुपारी दीड वाजेपर्यंत विद्यार्थ्यांना शाळेचे दार उघडलेले पाहायला मिळाले नाही. यामुळे पालक व ग्रामस्थांनी संताप व्यक्त करत पंचनामा करून शिक्षण विभागाकडे तक्रार सादर केली.

दरम्यान, एकनाथवाडी येथील जांभळवाडी जिल्हा परिषद शाळा तब्बल दहा महिन्यांनंतर आज उघडली गेली. ऑक्टोबर २०२४ मध्ये एका व्यक्तीने ही जागा खासगी आहे असे म्हणत शाळेला कुलूप लावले होते. तेव्हापासून शाळा बंद होती. अखेर गटशिक्षणाधिकारी रामनाथ कराड, विस्तार अधिकारी हबीब मुंडे, केंद्रप्रमुख बाबासाहेब पोळ, पोलीस हवालदार अण्णा पवार, प्रकाश बडे यांच्या पथकाने आज सकाळी शाळेचे कुलूप उघडले. त्यामुळे विद्यार्थ्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला.

नोव्हेंबर २०२४ मध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जांभूळवाडी येथे सुदाम खेडकर यांनी शाळेस कुलूप ठोकल्याने शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान झाले. या प्रकाराला शिक्षण विभागातील तत्कालीन अधिकाऱ्यांची दुर्लक्ष कारणीभूत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. या प्रकरणात गटशिक्षण अधिकारी रामनाथ कराड यांनी प्रशासकीय कौशल्य दाखवत योग्य तो हस्तक्षेप करून प्रश्न निकाली काढला. आश्राबाई सुदाम खेडकर यांच्या मागण्यांकडे प्रशासन गांभीर्याने पाहील आणि त्यांची पूर्तता प्राधान्याने केली जाईल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला.

**-सचिन गायकवाड, उपसरपंच, एकनाथवाडी.**

# महानगरपालिकेच्या रेल्वे स्टेशन शाळेत विद्यार्थ्यांचे स्वागत

## पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश, शूजचे वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर:** सध्याच्या स्पर्धेच्या युगात महानगरपालिकेच्या शाळांमधूनही विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण देण्याचा प्रयत्न शिक्षण विभागाचे शिक्षक करत आहेत. विद्यार्थ्यांवर अभ्यासाचा ताण वाढणार नाही, अशा पद्धतीने त्यांना नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून शिक्षण देण्याचा प्रयत्न शिक्षकांनी करावा. विद्यार्थ्यांनीही मोबाईलचा अतिरिक्त वापर टाळून अभ्यासासह खेळालाही प्राधान्य द्यावे, असे प्रतिपादन आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी केले.




महानगरपालिकेच्या रेल्वे स्टेशन येथील शाळेत पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांना गुलाबपुष्प देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. शाळेच्या वतीने समग्र शिक्षा अभियान अंतर्गत मोफत पाठ्यपुस्तके, शालेय गणवेश, शूज इत्यादीचे वाटप करण्यात आले. आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाकडून शाळेत 'अतिसारावर करूया मात, स्वच्छ व ओआरएसची घेऊन साथ' हा उपक्रमही राबवण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनीषा शिंदे यांनी केले. भारती कवडे, मनीषा गिरमकर, वर्षा गायकवाड, विठ्ठल आठरे, मेघना गावडे, दीपाली नवले, शबनम खान यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

यावेळी सकाळ एनआयई समूहाचे वितरण शाखा प्रमुख देविदास आंधळे व समन्वयक शिल्पा धोपावकर यांनी विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे व अंकाचे वाटप केले. शिक्षण विभागाचे प्रशासन अधिकारी जुबेर पठाण, कार्यक्रम अधिकारी डॉ. दिलीप बागल, साथरोग अधिकारी सृष्टी बनसोडे, आरोग्य अधिकारी आयेशा शेख, स्टाफ नर्स, परिचारिका, आशा सेविका, अंगणवाडी सेविका आदी उपस्थित होते. मुख्याध्यापक विजय घिगे यांनी प्रास्ताविक केले.

# कैकाडी बाबा पालखी अग्रवाल यांच्याकडे मुक्कामी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** आषाढी एकादशी निमित्त महान तपस्वी कैकाडी बाबा व ह.भ.प कोंडीराम काका यांची पालखी पायी दिंडीने सालाबाद प्रमाणे मनमाड येथून श्री क्षेत्र पंढरपूर येथे आषाढी एकादशी निमित्त कोपरगाव शहरातून जात असतो त्यानिमित्ताने हा पालखी सोहळा मंगळवारी सायंकाळी कोपरगाव शहरातील सेवाभावी व्यक्तीमत्व नारायण शेठ अग्रवाल आणि परिवाराकडे मुक्कामी विसवणार आहे.

या दिंडीमध्ये सहभागी झालेल्या सर्व वारकऱ्यांची व्यवस्था कृष्णाई बॅंकवेट हॉल येथे करण्यात आली असून अग्रवाल परिवाराच्या वतीने संपूर्ण दिंडीचे स्वागत व भोजन व्यवस्था अग्रवाल परिवाराच्या वतीने करण्यात आली आहे. या प्रसंगी वारकऱ्यांना भेट वस्तू देण्यात येऊन संजीवनी उद्योग समुहाचे वतीने मोफत आरोग्य तपासणी करून त्यावर मोफत उपचार देखील करण्यात येणार आहेत. या दिंडीच्या स्वागतासाठी कोपरगावच्या पहिल्या महिला आमदार स्नेहलता कोल्हे तसेच सहकार महर्षी शंकरराव कोल्हे सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष विवेक भैय्या कोल्हे यांच्या सह शहरातील विविध पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते याप्रसंगी उपस्थित राहणार आहेत.



# ना. विखे पाटील जनसामान्यांचा आधारवड

## सचिन वराळ; अळकुटीत ना. विखे पाटील यांचा वाढदिवस साजरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** प्रवरानगर च्या लोणी सारख्या लहानशा खेड्यामध्ये विखे पाटील कुटुंबाने सहकाराची मुहूर्तमेढ रोवली. पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील, पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील, सिंधुताई विखे पाटील यांनी प्रारंभिक कालखंडात अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये समाजभिमुख काम उभे केले. याच कार्याचा वसा जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील पुढे चालवत आहेत. त्यांनी मंत्री म्हणून राज्याच्या राजकारणावर आपल्या कार्यकर्तृत्वाच्या जोरावर एक आगळावेगळा ठसा उमटविला आहे. त्यामुळे डॉ. राधाकृष्ण विखे पाटील जनसामान्यांचा आधारवड आहे, असे प्रतिपादन अळकुटी निघोज जिल्हा परिषद गटाचे नेते सचिन वराळ पाटील यांनी केले.

पद्मभूषण लोकनेते डॉ.बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या अळकुटी महाविद्यालयात पालकमंत्री तथा संस्थेचे अध्यक्ष ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या ६६ व्या अभिष्टचिंतन सोहळ्याचे औचित्य साधून महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी दिनेश बाबर यांनी विखे पाटील यांच्या समाजाभिमुख कार्याबद्दल ऋण व्यक्त केले तर भाऊसाहेब डेरे यांनी विखे पाटील घराणे कणखर नेतृत्वशील व दातृत्वशील असल्याचे म्हटले.



यावेळी प्राचार्या डॉ. कुंदा कवडे, पारनेर तालुका खरेदी विक्री संघाचे व्हाईस चेअरमन प्रसादराव शितोळे, निघोज - कान्हुर पठार भाजपाचे मंडलाध्यक्ष किसनराव शिंदे, भाजपाचे पारनेर तालुका उपाध्यक्ष अतुलराव माने, माजी सरपंच बाळासाहेब आवारी, डॉ. बाबुराव म्हस्के, कैलास गोर्डे, आप्पा पाचर्णे, किरण शेंडकर, शशिकांत कनिंगध्वज, चांगदेव गाडिलकर, स्वप्नील पारखे, प्रणल भालेराव, नितीन घोलप, प्रतिक वरखडे, चंद्रकांत शिंदे, संपतराव शिरोळे, संभाजी पुंडे, संपत जाधव, हभप संभाजी महाराज दराडे, प्रा. अर्जुन चाटे, प्रा. विशाल रोकडे, प्रा. प्रियंका दिवटे, प्रा. संजय जाधव, सूर्यमाला भोर, प्रा.पोपट सुंबरे, प्रा. संदीप गेटम, प्रा. राजाराम गोर्डे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्राचार्या डॉ. कुंदा कवडे यांनी केले तर आभार प्रा. विशाल रोकडे यांनी मानले.

# दारूच्या विळख्यात हनुमान टाकळी गाव

## महिलांची पोलिसांकडे दारूबंदीची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** हनुमान टाकळी (ता. पाथर्डी) येथील महिलांनी गावातील बोकाळलेल्या अवैध दारू विक्रीविरोधात आक्रोश करत पाथर्डी पोलीस ठाण्याचे नवनियुक्त पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांच्याकडे न्यायाची मागणी केली.गावात रोजच अवैध दारू विकली जाते. नवरे, तरुण मुलं, अगदी लहान मुलंही दारू पिऊ लागले आहेत. व्यसनाधीन नवरे घरात जनावरांसारखी मारहाण करतात. रात्री घराबाहेर झोपावे लागते. घरातील वस्तू, जनावरे विकून दारूसाठी पैसा उधळला जातो. अशा शब्दांत महिलांनी आपल्या व्यथांची कैफियत मांडली.

महिलांनी पोलीस निरीक्षक पुजारी यांना निवेदन देत गावात दारूबंदी लागू करण्याची ठाम मागणी केली. यावेळी महिला अक्षरशः डसा-डसा रडत होत्या. गावातील बहुतांश पुरुष, तरुण व लहान मुले दारूच्या आहारी गेले आहेत. महिलांना घरगुती हिंसाचाराचा सतत त्रास होत आहे. घरातील वस्तू दारूसाठी विकल्या जातात. महिलांची पूर्वी लेखी तक्रार असूनही पोलीसांची प्रभावी कारवाई झाली नाही.



राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) महिला तालुकाध्यक्ष मनीषा डांभे यांचे नेतृत्व लाभले असून, अलका गायकर, शोभा आंधळे, सविता गायकवाड, चंद्रकला बर्डे, नंदा दगडखैर, राहीबाई दगडखैर, सुनिता उदार, गयाबाई बर्डे, भामा बर्डे, हिराबाई बर्डे, रंजना बर्डे, सीता दगडखैर, रुक्मिणी दगडखेड, इंदुबाई बावणे, वैशाली शेळके, सुनीता राजळे, रेणुका शेळके यांच्यासह मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

### पोलीस निरीक्षकांचा सल्ला महिलांना खटकला

महिलांच्या तक्रारीनंतर पोलीस निरीक्षक विलास पुजारी म्हणाले, दारू बंद केली तर पिणारे दुसऱ्या गावात जाऊन पिऊन येतील. लहान मुलांवर संस्कार करा. पतींविरोधात तक्रार द्या, आम्ही सर्वांना बोलावतो.मात्र महिलांनी यावर तीव्र प्रतिक्रिया दिली.साहेब नवऱ्याविरोधात तक्रार केली तर संसार मोडेल, घरचे दरवाजे बंद होतील. कायद्याच्या चौकटीपलीकडे जाऊन आमच्या भावना समजून घ्या.

# संत निवृत्तीनाथांच्या दिंडीचे संगमनेरात स्वागत

## माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्याकडून वारकऱ्यांसाठी सुविधा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** शेकडो वर्षाची परंपरा असलेल्या श्री संत निवृत्तीनाथ महाराज पालखीचे आज अहिल्यानगर जिल्ह्यात आगमन झाले. माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली अमृत उद्योग समूहाच्या वतीने वारकऱ्यांची सर्व सुविधा करण्यात आली असून रिमझिम पाऊस व अत्यंत भक्तीमय वातावरणात नाशिक पदवीधर मतदारसंघाचे माजी आ. डॉ. सुधीर तांबे व इंद्रजीत भाऊ थोरात यांच्यासह गावकऱ्यांनी या पालखीचे अभूतपूर्व स्वागत व पूजन केले.

पारेगाव बु.येथे पंढरपूर साठी निघालेल्या या पालखीचे सुमारे २० हजार वारकऱ्यांसमवेत आगमन झाले. यावेळी माजी आ.डॉ. सुधीर तांबे व इंद्रजीत भाऊ थोरात यांनी पालखीचे पूजन केले यांप्रसंगी समवेत निवृत्तीनाथ देवस्थानचे अध्यक्ष अ‍ॅड. सोमनाथ घोटेकर, अप्पर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर,उपविभागीय पोलीस अधिकारी कुणाल सोनवणे, पोलीस निरीक्षक देविदास ढूमने, अ‍ॅड. त्र्यंबकराव गडाख, साहेबराव गडाख, दौलत गडाख, सोमनाथ गडाख, सचिन गडाख, बी. आर. चकोर, नवनाथ आरगडे, विजय राहणे आदींसह विविध पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

रिमझिम पावसात सुमारे २० हजार वारकरी या दिंडीमध्ये सहभागी झालेले आहेत. मोठ्या आनंदाने व भक्तिभावाने या वारकऱ्यांनी हरिनामाचा गजर करत टाळ मृदुंगाच्या तालावर विविध अभंग गात जिल्ह्यात प्रवेश केला. अश्विनाथ विद्यालयाचे लेझीम पथक, पारंपारिक वाद्य व वेशभूषा करून गावकऱ्यांनी व विद्यार्थ्यांनी या पालखीचे स्वागत केले.




डॉ.सुधीर तांबे म्हणाले की, संत निवृत्तीनाथ महाराज पालखीला मोठी परंपरा आहे. दरवर्षी कॉंग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात हे जिल्ह्यात प्रवेश करताना या पालखीचे स्वागत करतात.महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे .वारकरी संप्रदाय हा हजारो वर्षांपूर्वीच असून सर्वांना सोबत घेऊन जाणारा आहे.

### वारकऱ्यांसाठी सर्व सुविधा

जिल्ह्यात प्रवेश करताना दरवर्षी कॉंग्रेस पक्षाचे नेते माजीमंत्री बाळासाहेब थोरात उपस्थित राहून पालखीचे स्वागत करतात. ते दिल्लीत असल्याने त्यांनी यावेळी त्यांनी दूरध्वनी वरून वारकरी व गावकरी यांच्याशी संवाद साधला. तसेच वारकऱ्यांसाठी एसएमबीटी सेवाभावी ट्रस्टच्या माध्यमातून ॲम्बुलन्स, अमृत उद्योग समूहातील संस्थांच्या माध्यमातून वारकऱ्यांसाठी राहण्याची सुविधा, पिण्याच्या पाण्याचा टॅंकर, दवाखाना, लाईट यांसह सर्व सुविधा उपलब्ध करून देताना संगमनेर तालुक्यातून दिंडी जाऊपर्यंत सर्व सुविधा पुरविण्याच्या सूचना यशोधन व अमृत उद्योग समूहाला दिले असून इंद्रजीत थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली वारकऱ्यांना सर्व सुविधा देण्यात आले आहेत.

## संपादकीय

# नवी भूमिका समजून घेण्याची गरज

फादर्स डे अर्थात पितृदिन १५ जून रोजी जगभरात साजरा केला जातो. या निमित्ताने पिता आणि मुलांच्या नात्याचे विविध कंगोरे तपासले जातात. आजच्या घडीला तसे करणे परिस्थितीनेही आवश्यक बनवले आहे. हसाचार, बलात्कार यासारखे क्रौर्य पुरुष करतात. असे दुष्कृत्य करणारे काही पुरुष पितादेखील आहेत. मात्र बाप असूनही ते असे वागत असतील तर त्यांच्या पुरुषपणाच्या कल्पना काय आहेत, त्या कशा चुकीच्या आहेत हे समजावून सांगायला हव्यात. पुढे त्या त्यांनी आपल्या मुलाला सांगायला हव्यात. एकूणच पुरुषांनी मुलांशी बोलताना थोडा मोठेपणा दाखवण्याची गरज आहे. मग त्यावेळी भूतकाळात हातून झालेल्या चुकांची कबुली देण्यातही त्यांना कमीपणा वाटता कामा नये. 'लग्न झाल्यानंतर मी बायकोशी फारसा चांगला वागलो नाही, पारंपरिक पुरुषत्वाने तिच्याशी वर्तन केले. ते बघत तू मोठा होत आहेस. पण आसपासची स्थिती बघून मी चुकलो हे आता कळते...' असे मान्य करण्याचा मोठेपणा दाखवणे गरजेचे आहे. आसपासचे वातावरण, घटना बघून आपल्याला आपल्या मुलीच्या भविष्याची काळजी वाटते, हे त्याने स्पष्ट केले पाहिजे. आपल्या मनात परंपरेने पुरुषत्व म्हणजे काय, बापमाणूस कसा असला पाहिजे, तो कसा निर्भिड असला पाहिजे, तो कसा रडला नाही पाहिजे, महत्त्वाकांक्षी कसा हवा आणि जग जकण्याचे सामर्थ्य कसे हवे हे आणि यासारखे विचार पूर्वीपासून पेरले आहेत. परंपरेने सांगितलेले पुरुषपणाचे हे सगळे निकष पाळले की आपण समर्थ झालो, असे आजही काही पुरुषांना वाटते. पुढे हेच अधिकार त्यांना सत्ता देतात आणि सत्ता माणसाला भ्रष्ट करते हे आपण जाणतो. म्हणूनच मी म्हणेन ते आणि तसेच व्हायला पाहिजे, अशी पुरुषाची अपेक्षा असते. त्याला सगळेच कळत असते...! तेव्हा या भ्रामक कल्पनेतून बाहेर पडत, आपल्या चुकांची कबुली देत महिलांशी योग्य प्रकारे वागण्याचे धडे दिले, घरातील महिलांना सन्मानाने वागवण्याची शिकवण दिली तरच पुढील पिढी चांगली घडू आणि वागू शकेल. तेव्हा पितृदिनाच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक पित्याने याचाही विचार केला पाहिजे. आपली प्रतिमा बदलण्याचा हा प्रयत्न कुटुंबाचेच नव्हे तर, समाजाचेही भले करुन जाईल.

आज चळवळींमुळे सगळ्या नाही तरी काही महिला सजग झाल्या आहेत. दुसरीकडे मुलींचे गर्भ पाडून टाकल्याने पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांची संख्या कमी आहे. त्यामुळे आता विवाहेच्छुक मुलांना बायको मिळण्याची पंचाईत झाल्याचे चित्र आहे. मुलांना या वस्तुस्थितीचे आकलन करुन देण्याची जबाबदारीही आता पित्याने घ्यायला हवी. एक गेली तर ५६ मिळतील, असे आम्ही पूर्वी म्हणत होतो. पण आता एक मिळणेही कठीण आहे, मिळाली तर टिकेल की नाही हे कठीण आहे, हे बापाने मुलांना समजावून सांगायला हवे. आता मुली अन्याय सहन करणार नाहीत. हा अत्यंत चांगला बदल पित्याने मुलांना सांगून योग्य प्रकारे वर्तन ठेवण्याचे धडे दिले तर ते विशेष गरजेचे आहे. मुलगा बिघडला की बरेचदा आईला दोष दिला जातो. तिचे संस्कार कमी पडले, असे म्हणत दुषणे दिली जातात. पण वडिलांचे काय? संस्कार करण्यात त्यांची काहीच भूमिका नसते का? या प्रश्नांची उत्तरे आताचा काळ मागतो आहे. खरे तर वडील बोलण्यातून नव्हे तर कृतीतून मुलांना संस्कारित करत असतात. ते कळत नकळत होतच असते. म्हणूनच मुलगा बिघडला तर आईइतकाच पुरुषाचाही दोष असतो. बापाचे वागणे बघुनच मुलगा चुकीचे वागलेला असतो. म्हणूनच हा तिढा सोडवण्यासाठी आता पित्यांनीच पुढाकार घेणे गरजेचे आहे. काळाची बदलती पावले लक्षात घेऊन या पुढील काळात पित्यांनी कुटुंबाबरोबरच समाजाकडेही डोळसपणे बघायला हवे. त्यासाठी समाजातील स्त्रीप्रश्न, चळवळी या सगळ्याकडेच बघायला हवे. हे केले तरच त्यांना स्त्री चळवळी काय म्हणतात हे समजेल. कोणतीही स्त्री चळवळ पुरुषविरोधी नाही; ती केवळ पुरुषप्रधान, पितृसत्ताक आणि अन्याय्य व्यवस्थेच्या विरोधात आहे. महत्त्वाचे म्हणजे ती बाई म्हणजे चांगली असा कोणताही दावा करत नाही. कारण या व्यवस्थेत बाईदेखील चांगला माणूस होतेच असे नाही. आवश्यकता होती तेव्हा तिला संधी, स्वातंत्र्य, समान वागणूक मिळत नाही. स्वाभाविकच मनाविरुद्ध होणाऱ्या गोष्टी ती कटकारस्थाने करुन बरोबर साध्य करुन घेते. दुसरीकडे, पुरुष सत्तेतून हवे ते मिळवतो. एकंदरच ही सगळी व्यवस्था कोणालाच चांगला माणूस म्हणून घडवत नाहीत, जगू देत नाहीत. तेव्हा ही स्थिती बदलण्यासाठी आता पुरुषांनी आपल्या मुलांना आणि मुलीला समजून सांगायला हवे. नव्या काळात घरातल्या मुलींची भूमिकाही बदलत आहेत. मुली स्वत:चे निर्णय घेतात. स्वावलंबी होतात. पण स्वातंत्र्य हे मूल्य असल्याचे पित्याने आपल्या मुलींना सांगायला हवे. म्हणजेच तिला हवे तसेच समोरच्या माणसालाही स्वातंत्र्य हवे आहे. तरच हा विचार तिच्या मनाला पटेल आणि ती घरातील लोकशाहीचा सन्मान करेल. मुलगा वा मुलगी आत्मकेंद्री, आत्ममग्न आणि केवळ स्वत:चा विचार करु लागल्यास कुटुंबाला वा समाजाला कधीच स्वास्थ्य मिळणार नाही. सरतेशेवटी चर्चेतील हगवणे प्रकरणानंतर पित्यांनी मुलामुलींच्या लग्नात पैशाचे किती प्रदर्शन करायचे, अवाजवी मागण्या किती मान्य करायच्या, बडेजावाला प्रतिष्ठेचे रुप द्यायचे की नाही याचाही गांभीर्याने विचार करायला हवा. मुलामुलींची लग्ने लावून दिली की पित्याची जबाबदारी संपते, हा जुना विचार झाला. आताच्या पित्याने मुलीचा सासरी नीट सांभाळ होतोय की नाही, हे पाहायला हवे. तिची तक्रार लक्षपूर्वक समजून त्यावर योग्य कृती करायला हवी. तिला असुरक्षित वाटत असेल तर मानाने माहेरी स्थान द्यायला हवे.

# डिजिटल प्रतिकृती, उद्याचे आभासी वास्तव!



**तंत्रवेध**

**– डॉ. दीपक शिकारपूर**

एखाद्या वस्तूचा डिजिटल ट्विन म्हणजे त्याची आभासी प्रतिकृती. ही प्रतिकृती मूळ वस्तू/व्यक्तिची इत्थंभूत माहिती मिळवून पूर्ण जीवनचक्राचे सदृशीकरण (सिम्युलेशन) करते. डिजिटल ट्विन म्हणजे एखाद्या वास्तविक वस्तूचे, प्रणालीचे किंवा प्रक्रियेचे एक अत्यंत तपशीलवार आभासी प्रतिबिंब असते. हे प्रतिबिंब सॉफ्टवेअरच्या सहाय्याने तयार केले जाते आणि वास्तविक वस्तूच्या सर्व वैशिष्ट्यांचे अनुकरण करते. या तंत्राचा हा परिचय.

सयामी जुळे वा जुळ्या व्यक्तींबद्दल आपण जाणतो. साधारण एकमेकांसारखेच दिसणारे व काही वेळा एकसारखाच विचार करणारे ते एक व्यक्तिमत्व असते. अनेक वेळा जुळे इतके सारखे दिसतात की कोण कुठला हेही ठरवणे अवघड जाते. हे झाले भौतिक विश्वाबद्दल. आता घटकेभर कल्पना करा की, आपली एक प्रतिकृती डिजिटली तयार झाली तर काय होईल? ही वास्तवाशी समांतर असणारी प्रतिमा असेल आणि आपली नक्कलही असेल. आज असे काही घडत असून तंत्रज्ञानाचा नवसाक्षात्कार घडवत आहे. या प्रतिकृतीला डिजिटल ट्वीन (जुळे) असे म्हटले जाते. एखाद्या वस्तूचा डिजिटल ट्विन म्हणजे तिची आभासी प्रतिकृती. ही प्रतिकृती मूळ वस्तू/व्यक्तिची इत्थंभूत माहिती मिळवून पूर्ण जीवनचक्राचे सदृशीकरण (सिम्युलेशन) करते. डिजिटल ट्विन म्हणजे एखाद्या वास्तविक वस्तूचे, प्रणालीचे किंवा प्रक्रियेचे एक अत्यंत तपशीलवार आभासी प्रतिबिंब असते. हे प्रतिबिंब सॉफ्टवेअरच्या सहाय्याने तयार केले जाते आणि वास्तविक वस्तूच्या सर्व वैशिष्ट्यांचे अनुकरण करते. नित्यनेमाने नवोन्मेषाला सामोऱ्या जाणाऱ्या आजच्या काळात तंत्रज्ञानाचे असे आविष्कार सातत्याने पहायला मिळत असतात. त्यातील काही कल्पनेच्या पलिकडचे असतात, पण आपले जीवन मोठ्या प्रमाणात सुसह्य करतात. उद्याचे आभासी वास्तव ठरु शकणाऱ्या या डिजिटल प्रतिकृतीचे अंतरंग आवर्जून समजून घेण्यासारखे आहेत.

डिजिटल ट्विन हे एक अत्याधुनिक तंत्रज्ञान आहे, जे एखाद्या भौतिक वस्तू, प्रणाली किंवा प्रक्रियेचे अत्यंत तपशीलवार आभासी प्रतिनिधित्व करते. या आभासी प्रतिनिधित्वालाच डिजिटल ट्विन म्हणतात. तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे डिजिटल क्षेत्र आणि वास्तविक जगाचे एकत्रिकरण झाले आहे. यामुळे डिजिटल ट्विन तंत्रज्ञान हे एक अपरिहार्य साधन म्हणून उदयाला आले आहे. या तंत्रज्ञानामुळे उद्योगांना आकार मिळतो आहे व्यवहारांमध्येही क्रांती घडते आहे. सुरुवातीच्या काळात फक्त उत्पादनाच्या स्तरावर याची कल्पना केली होती. पण आता आभासी जगात आणि भौतिक वास्तवांसाठीही हे डिजिटल तंत्रज्ञान वापरात येणार आहे. 'डिजिटल ट्विन' हा शब्द सगळ्यात पहिल्यांदा २००२ मध्ये मिशिगन विद्यापीठात डॉ. मायकेल ग्रीव्हस यांनी सादर केला होता. सुरुवातीच्या काळात उत्पादन क्षेत्रात ही संकल्पना मांडण्यात आली होती. त्यानंतर ही कल्पना मोठ्या प्रमाणात ॲप्लिकेशन्सचा समावेश करण्यासाठी विकसित झाली. डिजिटल ट्विनमध्ये विविध परिस्थितींचे अनुकरण करून आणि डेटाचे विश्लेषण करून भविष्यसूचक देखभाल, परिपूर्ण व्यवहार आणि उत्पादन विकासामध्ये नाविन्य आणले जाते. भौतिक मालमत्ता आणि प्रक्रियांच्या कामगिरीचे परीक्षण, विश्लेषण आणि त्याची क्षमता वाढवण्यासाठी उत्पादन, आरोग्य सेवा, वाहतूक आणि शहरी नियोजन यासारख्या विविध उद्योगांमध्ये डिजिटल ट्विन्सचा वापर केला जातो. हे तंत्रज्ञान वेगवेगळ्या परिस्थितींची पडताळणी करू शकते, त्याच्या परिणामांचा अंदाज लावू शकते आणि निर्णय घेण्यासाठीही मदत करू शकते.

मेटाव्हर्समध्ये एक आभासी जागा तयार केले जाते. यामध्ये वापरकर्ते डिजिटल वातावरणाशी आणि एकमेकांशी संवाद साधतात आणि डिजिटल ट्विनिंगला अनेक प्रकारे छेदतात. मेटाव्हर्स विकसित होत असताना समग्र आणि एकमेकांशी जोडलेले आभासी जग तयार करण्यासाठी डिजिटल ट्विन कणा म्हणून काम करू शकतात. हे तंत्रज्ञान वापरकर्त्यांना मेटाव्हर्समध्ये स्वतःचे अत्यंत तपशीलवार आणि अचूक प्रतिनिधित्व तयार करण्यास सक्षम बनवू शकते. यामुळे वैयक्तिक स्वरूपाचे आणि खरे असल्यासारखे अनुभव घेता येतात. उदाहरणार्थ, व्हर्च्युअल शॉपिंगमध्ये उत्पादनांचे डिजिटल ट्विन्स खरेदीचे निर्णय घेण्यासाठी वापरकर्त्यांना मदत करू शकतात. शिवाय डिजिटल ट्विन्स मेटाव्हर्समधील विविध मंच आणि यंत्रणांमधली देवाणघेवाण सुलभ करतात. तसेच विविध आभासी वातावरणांमध्ये अखंड संवाद आणि परस्परसंवादही घडवून आणतात. या देवाणघेवाणीमुळे परस्परसंबंधित अनुभव घेता येतात आणि जागतिक स्तरावर सहयोग आणि नवकल्पना वाढीला लागते. डिजिटल ट्विन्स विविध क्षेत्रांमध्ये खोली, समृध्दी आणि कार्यक्षमता वाढवून मेटाव्हर्सचा लक्षणीय विस्तार करू शकतात. याव्यतिरिक्त स्मार्ट शहरे, औद्योगिक संयंत्रे किंवा नैसर्गिक वातावरण यासारख्या संपूर्ण इकोसिस्टीमचा समावेश करण्याच्या उद्देशाने डिजिटल ट्विन वैयक्तिक प्रतिनिधित्वाच्या पलीकडे विस्तारू शकतात. रिअल-टाइम डेटा आणि सिम्युलेशन एकत्रित करून हे तंत्रज्ञान बहुआयामी आणि प्रतिसादात्मक आभासी जग आणखी सक्षम करते. यामुळे त्यांचे भौतिक समकक्ष जवळून प्रतिबिंबित करता येतात.

डिजिटल जुळे डेटा स्त्रोतांशी जोडलेले असतात. परिधान केलेल्या एका छोट्या उपकरणाद्वारे आपले डिजिटल विश्व साठवले जाते, आपण भेटलेल्या व्यक्ती, त्यांचे सोशल प्रोफाईल्स, झालेले संभाषण, व्यवहार या सर्व बाबींचा त्यात अंतर्भाव असतो. अनेक वर्षांच्या साठवणुकीनंतर या माहितीचे एआय तंत्राद्वारे पृथकरण करून काही विशिष्ट साचे, वर्तणुकीचे प्रकार तयार केले जातात. या संकल्पनेचा उपयोग आपल्याला स्मरण केलेल्या गोष्टी साठवण्यासाठी करता येऊ शकतो. मानवी मेंदूमध्येही अफाट क्षमता असते, पण त्यात कालानुरूप त्रुटी निर्माण होतात. अनेकांना विस्मरण होते, एखादी व्यक्ती समोर येते पण नाव आठवत नाही. कधी कधी नाव आठवते पण व्यक्ती डोळ्यासमोर येत नाही. इथे आपला डिजिटल जुळा मदत करू शकतो. एआयमधील प्रिडिक्टिव्ह अॅनॅलिटीक्स तंत्रामुळे आपण एखाद्या व्यक्तीला वा ठिकाणी जायच्या आधी त्यासंबंधी माहितीची खातरजमा, उजळणी आधीच करू शकतो. काही टूल्स तुमची रिअलटाइम मदत करू शकतात. जर आपला घसा बसला असेल तर आपल्या वतीने संभाषणही करू शकतात. यात आपल्या आवाजाचे, लकबींचे पृथ:करण केलेले असते. यासाठी आपले संभाषण (अनेक वर्षांचे) रेकॉर्ड केले जाते. त्यासाठी वेअरबल (परिधान केलेले संगणकीय उपकरण) वापरले जाते.

प्लॉड या एआय उद्योगाने नोट नावाचा एक स्लिम सक्षम ऑडिओ रेकॉर्डर विकसित केला आहे. तो तुमच्या फोनच्या मागील बाजूस अडकवला जाऊ शकतो किंवा तुमचे संभाषण रेकॉर्ड करण्यासाठी, हावभाव रेकॉर्ड करण्यासाठी आणि सारांशित करण्यासाठी शर्टच्या खिशात ठेवला जातो. हे तंत्र नेहमी तुमचे संभाषण ऐकते आणि कालांतराने तुमचे व्यक्तिमत्त्व, तुमची प्राधान्ये, तुमचे संवाद जाणून घेत काही वर्षात तुमचे, डिजिटल जुळे तयार करते. या तंत्रात आणि चॅटजीपीटीसारख्या जनरेटिव्ह एआय टूल्समध्ये बराच फरक आहे. चॅटजीपीटी सार्वत्रिक डिजिटल माहितीसंग्रहाचे पृथ:करण करुन माहिती निर्माण करते. इथे तसे होत नाही. फक्त आपल्याशी संबंधित माहितीचे पृथ:करण आपला डिजिटल ट्वीन करतो आणि गरज पडल्यास आपली जागादेखील घेतो. यामुळे आपल्या मानवी मेंदूच्या क्षमता कमी होतील असे काहींना वाटते. गुगल मॅप वापरून आपण दिशा शोधतो आणि इच्छित स्थळाचा वेध घेतो. पूर्वी आपण स्मरणशक्तीला ताण देऊन विचारत विचारत एखादा पत्ता शोधत असू. एकदा कष्टाने शोधलेला पत्ता कायम लक्षात राहत असे. आता हेच तंत्र सर्वत्र हातपाय पसरू लागले आहे. यामुळे भविष्यात माणसाचे आयुष्य सुसह्य नक्की होणार आहे. फक्त एक मोठा धोका आहे तो सुरक्षेचा. आपल्याबद्दलची सर्व माहिती सायबर गुन्हेगारांनी चोरली तर ते दुरुपयोग करू शकतात. सर्वच तंत्रांना असा धोका असतोच. त्यामुळे जास्त काळजी घेतली पाहिजे हेच अंतिम सत्य.

वशशरिज्ञऽवशशरिज्ञीहळज्ञर्रीी.लो

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

# स्व. परजणे यांच्या पुण्यस्मरणानिमित्त विविध कार्यक्रम




**जनता आवाज वृत्तसेवा**

**संवत्सर** : गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पाटील तालुका सहकारी दूध उत्पादक संघाचे संस्थापक दिवंगत नामदेवरावजी परजणे यांच्या २१ व्या पुण्यस्मरण सोहळ्यानिमित्त संवत्सर येथे नामदेवराव परजणे पाटील महाविद्यालयाच्या प्रांगणात दि. १८ जून रोजी दुपारी २ वाजता विद्या विनोद वैभव हभप विश्वनाथ महाराज वाडेकर (चाळीसगाव) यांचे योग.. उद्योग.. व देव.. या विषयावर प्रवचन होणार आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हभप उध्दव महाराज मंडलिक (नेवासा) यांच्या अध्यक्षतेखाली हा प्रवचन सोहळा संपन्न होणार आहे. तसेच दि. १९ जून रोजी दुपारी २ वाजता श्रीरामपूर येथील ज्येष्ठ विनोदी व्याख्याते प्रा. हंबीरराव नाईक यांचे हसण्यासाठी जीवन आपुले या विषयावर व्याख्यान होणार आहे.

तसेच दि. २० जून २०२५ रोजी दुपारी २ वाजता पुणे येथील महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्यवाहक वि.दा. पिंगळे यांचे संत परंपरा व सामाजिक प्रबोधन या विषयावर व्याख्यान होणार असून या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी पुणे येथील शिक्षण तज्ञ अनिलराव गुंजाळ हे उपस्थित राहणार आहे.

तीन दिवस सलग चालणाऱ्या या कार्यक्रमाचा कोपरगाव पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समस्त परजणे पाटील परिवार व समस्त संवत्सर ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पाटील तालुका सहकारी दूध उत्पादक संघाचे चेअरमन राजेश परजणे पाटील यांनी जेष्ठ पत्रकार सुरेश रासकर यांचे नुकतेच निधन झाल्याने त्यांना दूध संघाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

# ना. विखेंच्या वाढदिवसानिमित्त घरकुल लाभार्थ्यांना वाळू वाटप



**जनता आवाज वृत्तसेवा**

**आश्वी** : जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलेल्या आवाहानाला प्रतिसाद म्हणून त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आश्वी खुर्द येथील सुमारे ७० घरकुल लाभार्थ्यांना शासनाच्या धोरणानुसार सुमारे ३५० ब्रास वाळू मोफत वाटपाचा उपक्रम केल्याची माहिती ग्रामपंचायत उपसरपंच बाबा भवर यांनी दिली.

अहमदाबाद येथील विमान अपघाताच्या दुर्दैवी घटनेच्या पार्श्वभूमीवर मंत्री विखे पाटील यांनी वाढदिवस साजरा न करण्याचा निर्णय जाहीर करुन कोणतेही सत्कार सोशल संभारभ आयोजित न करता सामाजिक उपक्रम राबवावेत, असे आवाहन केले होते.

त्यानुसार आश्वी खुर्द ग्रामपंचायतीचे लोकनियुक्त महिला सरपंच अलकाताई गायकवाड, उपसरपंच बाबा भवर, सर्व ग्रामपंचाय सदस्य, ग्रामविकास अधिकारी प्रविण इल्हे, तलाठी सुर्यकांत रणशुर, ओमप्रकाश गाडेकर, मंडलाधिकारी अनिल आव्हाड यांच्यामार्फत संगमनेर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संगमनेर तहसिलदार जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयाकडे रितसर पत्रव्यवहार करत आश्वी खुर्द येथील शासकीय वाळु डेपोतील शिल्लक वाळु स्थानिक घरकुल लाभार्थ्यांना शासनाच्या वाळु धोरणानुसार प्रत्यक घरकुल लाभार्थांना ५ ब्रास वाळू मोफत मिळावी अशी मागणी केली होती.

त्यानुसार ना. विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त वाळु वाटपाचा शुभारंभ सरपंच अलका गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी विखे पाटील कारखान्याचे संचालक ॲड. अनिल भोसले, ना. विखे यांचे स्विय सहाय्यक बापुसाहेब गायकवाड, मकरंद गुणे, उपसरपंच बाबा भवर, विकास गायकवाड, मोहीत गायकवाड, संजय भोसले, सोपान सोनवणे, कल्पना क्षिरसागर, विजय गायकवाड, रमेश सिनारे, अशोक भोसले, कैलास गायकवाड, संतोष भडकवाड, दिपक सोनवणे, इसुब शेख यासह घरकुल लाभार्थी उपस्थित होते.

# सिद्धार्थनगरच्या समस्या सोडविण्याची आ. जगतापांकडे मागणी



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : सिद्धार्थनगर परिसरात अनेक वर्षापासून हा परिसर नागरी सुविधा पासून वंचित असल्याने नागरी समस्या सोडवण्याच्या मागणीसाठी आमदार संग्राम जगताप यांना निवेदन देताना सिद्धार्थनगर परिसरातील रहिवासी अंकुश मोहिते समवेत दिव्या पवार, चंदा वैराळ, ज्योती काळे, गायत्री ससाने, माया वैरागर, अनिता कांबळे, छबु बुलाखे, पायल भालेराव, ज्योती शेंडगे, मंगल भागवत, इंदुबाई खुडे, कल्पना काते, संगीता नन्नवरे, काजल रोकडे, संजू डाके, विशाल पाटोळे, विशाल भालेराव, आकाश पवार, प्रभाकर लोखंडे, राम भास्कर आदीसह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निवेदनात म्हटले आहे की, सिद्धार्थनगर परिसरात अनेक वर्षापासून रहिवासी असून नागरी सुविधा पासून वंचितआहे. आमच्या भागात गटार व रस्त्याची दुरावस्था झालेली आहे तसेच घाणीचे साम्राज्य मोठ्या प्रमाणात निर्माण झाले असून त्यामुळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. पावसाळ्याच्या दिवसात मलेरिया, डेंगू अनेक आजारे निर्माण होण्याची शक्यता असल्याने लवकरात लवकर सिद्धार्थनगर भागातील नागरी समस्या सोडवण्याच्या मागणीसाठी आ. जगताप यांना निवेदन देण्यात आले आहे.

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

## कोल्हार न्यू इंग्लिश स्कूलमध्ये नवागतांचे स्वागत

एसआरबी न्यूजचे संतोष बोरुडे, पत्रकार गणेश सोमवंशी, पत्रकार कुंभकर्ण, पत्रकार अन्वर भाई, सीटीव्ही न्यूज चॅनलचे गणेश रांधवणे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाचे मुख्याध्यापक अंकुशराज जामदार यांनी केले. तर मान्यवरांचे स्वागत ज्येष्ठ शिक्षक शब्बीर शेख यांनी केले. आभार विद्यालयाच्या पर्यवेक्षिका संजीवनी आंधळे यांनी मानले. विद्यालयाचे उपमुख्यधापक सिताराम बोरुडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सुत्रसंचालन दिपक मगर यांनी केले. या कार्यक्रमास ग्रामस्थ, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व उपस्थित मान्यवरांनी सर्व विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी विद्यार्थ्यांना व सेवकांना शुभेच्छा दिल्या.

## रुग्णालयाच्या घटनेतील दोषींवरकारवाई करा : आ. काळे

बातम्यांची आ. काळे यांनी दखल घेवून जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया व जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय घोगरे यांच्याशी संपर्क करून त्यांना या घटनेची शहनिशा करून वसखोल चौकशी करून दोषींवर कडक कारवाई करण्याच्या सूचना केल्या आहेत.

## अहमदनगरऐवजी अहिल्यानगर करा

शाळा प्रवेश घेताना जो अडथळा येत आहे, तो त्वरित दूर व्हावा. यासाठी डॉ. तनपुरेंनी मागणी केली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात सर्वत्र शाळा महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. प्रवेश प्रक्रियेमध्ये विद्यार्थी, पालक यांचे आधार कार्ड झेरॉक्स अनिवार्य आहे. साधारणतः दोन महिने होत आले तरी अद्यापही या संबंधात कोणतीही कारवाई कार्यवाही न झाल्याने अहिल्यानगर नावाची अडचण विद्यार्थी, पालकांना व संस्थाचालकांना डोकेदुखी ठरत आहे. आधाक्षचे मुख्य केंद्र यूएडीएआय कडून कोणतीही कारवाई झालेली नाही. एवढेच नव्हे तर अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयाने युएडीआय यांना या बदलाची माहिती देणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे विद्यार्थी पालकांची डोकेदुखी कायम आहे. त्यामुळे प्रवेश प्रक्रियेमध्ये बहुतांश ठिकाणी बाधा येत आहे. मात्र उपजिल्हाधिकारी यांची बदली झाल्याने नवीन उपजिल्हाधिकारी कार्यालयाकडून याबाबत पुढील पाठपुरावा न झाल्याने हे नवीन आधार किट संच वाटप झालेले नाहीत. त्यामुळे सध्या बहुतेक ठिकाणी विद्यार्थी, पालक नागरिकांचे मोठी गैरसोय झालेली आहे.

## मंजूर झालेले अभियायांत्रिकी महाविद्यालय नगर शहरात करा

सरकारचे आभार मानले व हे महाविद्यालय नगर शहरातच व्हावे, हा आग्रह शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांकडे धरला व त्यास मुखमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. त्याचबरोबर वैद्यकीय क्षेत्रातील काही अधिकारी हे महाविद्यालय नगर शहरात होवू नये, म्हणून अडथळे आणत असल्याची माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांना देण्यात आली. त्याचबरोबर अहिल्यानगर जिल्हा हा क्षेत्रफळाच्या दृष्टीने तसेच राजकीय, सामाजिक व सहकार अशा सर्वच दृष्टीने मोठा आणि महत्त्वाचा जिल्हा आहे. या शिष्टमंडळात माजी जिल्हाध्यक्ष प्रा. भानुदास बेरड, माजी जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर, जिल्हा परिषदेचे भाजपा गटनेते जालिंदर वाकचौरे, शहर सरचिटणीस सचिन पारखी, जेष्ठ नेते वसंतराव लोढा, शहर सरचिटणीस पंडित वाघमारे, शहर सरचिटणीस प्रशांत मुथा आणि इतरांचा समावेश होता.

# जिल्हा परिषद शाळा बनली जुगाऱ्यांचा अड्डा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**वैजापूर :** वैजापूर तालुक्यातील गोळवाडी येथील जिल्हा परिषद शाळा जुगाऱ्यांचा अड्डा बनली आहे. शाळेला सुट्ट्या असल्याने दिवसाच येथे जुगाऱ्यांचा खेळ रंगतो. जोडील मद्याचीही साथ असल्याने शाळेत पत्ते तसेच दारूच्या बाटल्यांचा खच आढळून येत आहे.

जिल्हा परिषद शाळा गोळवाडी येथील मुख्याध्यापिका यांनी असे सांगितले की, आम्ही १२ जून रोजी शाळा पूर्ण स्वच्छ केली होती. १३ जून रोजी पुन्हा शाळेमध्ये जिकडे तिकडे पत्ते, दारूच्या बाटल्या व गुटखा पुड्या खाऊन सर्व शाळेच्या वट्यावरती थुंकलेले आहे. भिंतीवरती पण थुंकलेले आहे. त्यावेळेस तेथे चव्हाण व शालेय कमिटीचे उपाध्यक्ष गणेश मिसाळ हे पण उपस्थित होते. त्यांनी शाळेचे पाहणी केली असता शाळेच्या परिसरामध्ये दारूच्या बाटल्या पत्ते व गुटखा पुड्या पडलेल्या आहे व पुड्या खाऊन तेथेच थुंकलेले आहे. त्यामुळे शाळेच्या आजूबाजूला किराणा दुकानांमध्ये गुटखा पुड्या विकल्या जातात असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. व रस्त्याच्या कडेला काही ठिकाणी दारू पण विकली जाते.

### कारवाई होणे गरजेचे

ग्रामस्थांचे व शाळेच्या शिक्षकांचे म्हणणे आहे की, शाळेच्या परिसरातील आजूबाजूला असणाऱ्या किराणा दुकानातील गुटखा पुड्या विकणाऱ्या वरती कारवाई झाली पाहिजे. या रोडवरती खुलेआम दारू विक्री केली जाते. ती पण बंद झाली पाहिजे.

# नगरपरिषदेसाठी एका प्रभागात दोन नगरसेवक

## आता १२ प्रभागांसाठी २४ नगरसेवक, तीन नगरसेवकांची झाली वाढ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** जामखेड नगरपरिषद निवडणूकीसाठी प्रशासन पातळीवर हालचालीस सुरुवात झाली आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार निवडणूक होणार आहे. या निवडणुकीत नगरसेवकांची संख्या तीनने तर प्रभाग संख्या १२ आहे. २०१५ च्या पहिल्या निवडणुकीसाठी २१ प्रभाग व २१ नगरसेवकांची संख्या होती. यावर्षी एका प्रभागात दोन नगरसेवक प्रमाणे १२ प्रभाग तयार करण्यात येत असून या प्रभाग रचनेचा प्रारूप आराखडा ४ जुलै रोजी तयार करण्यात येणार आहे. त्या दृष्टीने नगरपरिषदेत मोठ्या हालचाली सुरू झाल्या आहेत.

जामखेड शहर सात वाड्या-वस्त्यांचा समावेश नगरपरिषदेत आहे. २०११ च्या जनगणनेनुसार नगरपरिषद




लोकसंख्या ३९,५५१ आहे. चाळीस हजारांच्या पुढे लोकसंख्या होण्यासाठी ४५० लोकसंख्या कमी पडली नाहीतर जामखेड नगरपरिषदेला 'ब' दर्जा मिळाला असता. जामखेड नगरपरिषदेची स्थापना २०१४ साली झाली होती. दिड दोन वर्षांच्या प्रशासकीय काळानंतर निवडणूक आयोगाच्या सुचनेनुसार सन २०१५ प्रभागरचना करण्यात आली होती. त्यावेळी एका प्रभागात एक नगरसेवक यापध्दतीने २१ प्रभाग निर्माण करण्यात येऊन नगरसेवक संख्या २१ ठेवण्यात आली होती व २०१६ ला जामखेड नगरपरिषदेची पहिली निवडणूक झाली होती व निवडणूक आलेल्या नगरसेवकातून नगराध्यक्ष निवडण्यात आला होता.

जामखेडनगरपरिषदेसाठी २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या गृहीत धरली होती. दर दहा वर्षांनी होणारी जनगणना चार वर्षे होऊनही झाली नाही. १४ वर्षातील लोकसंख्या पाहता आता हा आकडा ५० हजारांपेक्षा जास्त झाला आहे. शासनाने २०११ ची जनगणनेच्या आधारे लोकसंख्या ३९५५१ धरली आहे. या निवडणुकीत क वर्ग नगरपरिषदांसाठी २५ जानेवारी २०२२ च्या राजपत्रानुसार ज्या शहराची

> जामखेड नगरपरिषदेचा क वर्ग नगरपरिषदेत समावेश आहे. त्यामुळे क वर्ग नगरपरिषदेसाठी निवडणूक आयोगाने घातलेल्या निकषानुसार ही निवडणूक होणार आहे. या निवडणुकीची पूर्व तयारी सुरू झाली आहे. पूर्वी २१ प्रभाग व २१ नगर-सेवक होते. आता एका प्रभागात दोन नगरसेवक व २४ नगर-सेवक व एक नगराध्यक्ष असे चार लोकप्रतिनिधी वाढले आहे.
>
> **-अजय साळवे,**
> **मुख्याधिकारी जामखेड**

लोकसंख्या २५ हजारापर्यंत आहे, अशा शहरासाठी किमान २०नगरसेवक राहतील आणि २५ हजार लोकसंख्येच्या पुढील ३ हजार लोकसंख्येसाठी एक नगरसेवक असेल.

जामखेड नगरपरिषद हद्दीतील लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार ३९,५५१ आहे. यामध्ये कोणतेही वाढ न सुचवता तेवढीच प्रमाण मानण्यात आली आहे. एका प्रभागात दोनच सदस्य ठेवण्यात आले आहेत असा निकष लागू आहे. २०१६ ला २१ प्रभाग व एक नगरसेवक असे प्रमाण होते. आता एका प्रभागात दोन नगरसेवक प्रमाणे १२ प्रभाग व २४ नगरसेवक करण्यात आले आहे व जनतेतून नगराध्यक्ष पद निवडण्यात येणार असल्याने एक नगराध्यक्ष व २४ नगरसेवक अशी एकूण २५ लोकप्रतिनिधी निवडण्यात येणार आहे. पाच वर्षांची नगरसेवक पदाची मुदत २०२१ ला संपली आहे तेव्हा पासून आत्तापर्यंत प्रशासक राजवट लागू आहे.

# गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वैजापूर :** वैजापूर तालुक्यातील युवा कॉम्प्युटर अकॅडेमी, शिवूर यांच्या वतीने एक भव्य व बहुपर्यायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात १००० वृक्षांचे वाटप करिअर मार्गदर्शन शिबिर पालक व माजी विद्यार्थी मेळावा आणि डिप्लोमा प्रमाणपत्र वितरण तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार अशा विविध उपक्रमांचा समावेश होता.मुख्य अतिथी म्हणून माजी शिक्षणाधिकारी धोंडिरामसिंह राजपूत यांनी उपस्थित ३०० हून अधिक विद्यार्थ्यांना व पालकांना मार्गदर्शन करताना सांगितले




की, कोणतीही शाखा लहान-मोठी नसते, कोणतेही शिक्षण कमी नसते. मुलांनी दररोज पालकांचे दर्शन घ्यावे आणि पालकांनीही शिक्षणात सक्रीय सहभाग घ्यावा. संस्थेचे प्रमुख समाधान जाधव यांनी प्रास्ताविकात सांगितले की, मुलांच्या घडणीत पालकांचा वाटा मोठा असतो. मी स्वतः माझ्या पालकांच्या संस्कारांमुळे आज इथे आहे. या प्रसंगी ज्ञानेश्वर महाराज माधाने, भोपळे महाराज, माजी जि.प. सदस्य सुनील दादा पैठाणपागरे, उपसरपंच नंदू बापू जाधव, बाळा पाटील, सरपंच पती विजय जिंजूडे, बाबासाहेब राऊत, शिवाजी आण्णा जाधव उपस्थित होते.

# सव्वा लाखांची विदेशी दारू पकडली

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** नेवासा तालुक्यातील नेवासा ते कुकाणा रोडवर अवैधरित्या वाहतूक होत असलेले विदेशी दारुची वाहतूक करणारे वाहन पकडून नेवासा पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

याबाबत पोलीस कॉन्स्टेबल अमोल डमाळे यांनी फिर्याद दिली असून त्याम म्हटले की, कुकाणा रोडवर वाहनातून (एमएच २५ पी ५६०१) विदेशी दारुची वाहतूक होत असल्याचे समजल्यावर अधिकाऱ्यांच्या आदेशाने छापा टाकला असता टाटा कंपनीच्या वाहनामध्ये १ लाख २८ हजार ४९६ रुपये किमतीच्या विदेशी दारुच्या १०८२ बाटल्या जप्त करण्यात आल्या. तसेच टाटा कंपनीची जीप (अंदाजे किंमत दीड लाख रुपये) असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या फिर्यादीवरुन वाहन चालक किरण शामराव पाटील (वय ४४ रा. श्रीरामपूर) याचेवर गुन्हा दाखल करण्यात आला. परीविक्षाधीन पोलीस उपअधिक्षक संतोष खाडे, हवालदार शहाजी आंधळे, पोलीस नाईक बाबा वाघमोडे, कॉन्स्टेबल हरी धायतडक, अमोल डमाळे, कॉन्स्टेबल संदीप ढाकणे, वाल्मीक वाघ यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# ना. विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार :** राज्याचे जलसंपदा मंत्री तसेच गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळाचे अध्यक्ष आणि अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त एक सामाजिक आणि पर्यावरणपूरक उपक्रम राबवण्यात आला.

या विशेष दिवशी तालुका कृषी अधिकारी भोरे, सहाय्यक कृषी अधिकारी जाधव, विखे पाटील कारखान्याचे संचालक ज्ञानेश्वर खर्डे पाटील, तसेच कृषक गटाचे सचिव, सदस्य यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

हा कार्यक्रम साई समर्थ सिमेंट प्रोडक्ट, पाईप कंपनी, राजुरी रोड,



कोल्हार बु. येथे पार पडला. या उपक्रमात परिसरातील शेतकरी, ग्रामस्थ, युवक व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी सहभाग घेतला. अनेक प्रकारच्या फळझाडे, औषधी वनस्पती व छायादायक वृक्षांची लागवड करण्यात आली. पर्यावरण संवर्धनाचा संदेश जनतेपर्यंत पोहोचवणारा हा कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला.तालुका कृषी अधिकारी भोरे साहेब यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ''प्रत्येक नागरिकाने एक तरी वृक्ष लावणे आणि त्याचे संगोपन करणे हे आजच्या काळात अत्यंत गरजेचे आहे.''सहाय्यक कृषी अधिकारी जाधव मॅडम यांनी उपस्थितांना वृक्षसंवर्धनासंदर्भात मार्गदर्शन केले, तर श्री. ज्ञानेश्वर खर्डे पाटील यांनी समाजातील प्रत्येक घटकाने पर्यावरण रक्षणासाठी एकत्र यावे असे आवाहन केले.

### दै. जनता आवाजच्या पुरवणीचे प्रकाशन

या कार्यक्रमात आणखी एक महत्त्वपूर्ण टप्पा म्हणजे 'जनता आवाज' या दैनिकाने ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त प्रकाशीत केलेल्या विशेष पुरवणीचे प्रकाशन सुद्धा करण्यात आले. या निमित्ताने माध्यम क्षेत्रात नव्या पर्वाची सुरूवात झाली असून, ग्रामीण भागातील आवाज या माध्यमातून अधिक प्रभावीपणे पोहोचेल, असा विश्वास अनेक मान्यवरांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामध्ये कृषक गटातील सर्व सदस्य उपस्थित होते.

# शाळेचा पहिला दिवस ठरला आनंददायी

## जोशी विद्यालयात विद्यार्थ्यांचे केले जोरदार स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** येथील दादा वामन जोशी नवीन मराठी शाळेत नुकताचप्रवेशोत्सवमोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या सोहळ्यात शाळेत नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन आणि औक्षण करून स्वागत करण्यात आले.

यावेळी शाळेचे चेअरमन ऋषिकेश जोशी, बालवाडी विभागाचे चेअरमन सुशील गांधी, आणि शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रसाद देशपांडे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय पाठ्यपुस्तके व खाऊ यांचे वाटप करण्यात आले आणि पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या



गेल्या. या प्रसंगी बोलताना मान्यवरांनी विद्यार्थ्यांना नियमित शाळेत येऊन ज्ञानाची कास धरण्याचे आवाहन केले, तसेच पालकांनीही मुलांना शाळेत नियमित पाठवावे असे सांगितले. या प्रवेश उत्सवामुळे विद्यार्थ्यांच्या मनातील शाळेविषयीची भीती कमी होऊन, ते आनंदाने शाळेत रमतील अशी भावना व्यक्त करण्यात आली. याप्रसंगीशाळेच्या आवारात सुंदर सजावट करण्यात आली होती. छोटा भीम, डोरेमॉन यासारखे कार्टून ठेवलेले होते. सेल्फी पॉईंट उभारण्यात आले होते. मुख्याध्यापक सचिन मुळे, भरत शेंगाळ, शिक्षक प्रतिनिधी अशोक परदेशी, अनिल गिरमे, बालवाडी विभाग प्रमुख अलका सराफ व प्रमिला इनामके आदी उपस्थित होते.

# गोळवाडी येथे मुलांना पुस्तके वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वैजापूर :** तालुक्यातील गोळवाडी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत पहिल्याच दिवशी मुलांना पुस्तके वाटप करण्यात आली.

पहिलीमध्ये काही मुलांनी नवीनच प्रवेश केला आहे. त्यांचाही शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला.त्यावेळेस गावातील नवनिर्वाचित ग्रामसेवक अधिकारी (शर्मा मॅडम) यांनी मुलांना शुभेच्छा दिल्या. त्याचप्रमाणे गावातील सरपंच (भाऊसाहेब पाटील शिंदे) यांनीही मुलांना शुभेच्छा देऊन त्यांच्या हस्ते पुस्तकांचे वाटप करण्यात आले. यावेळी सरपंच भाऊसाहेब शिंदे, ग्रामसेविका शर्मा, मुख्याध्यापिका डि. के, आहेर, पगार, काळे, चव्हाण, आळंजकर शिक्षक उपस्थित होते. तसेच सुनील पगार (शालेय अध्यक्ष) गणेश मिसाळ (शालेय उपाध्यक्ष) भीमराज पगार, साईनाथ पगार, डिगंबर वाकचौरे, ज्ञानेश्वर पगार (ग्रामपंचायत संगणक चालक), बाबासाहेब शिंदे, केशव शिंदे, व गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

# बस बंद झाल्याने विद्यार्थ्यांची मोठी गैरसाय

## श्रीरामपूर-वैजापूर बस चालू करण्याची पालकांची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नाऊर :** श्रीरामपूर-वैजापूरला जोडणाऱ्या पूर्वीचा राजमार्ग ४७ व नव्याने राज्यमार्ग ५१ वर वैजापूर बांधकाम विभागाकडून नाऊर गोदावरी पुलापर्यंत २० कि.मी. अंतराच्या कामासाठी शासनाच्या तरतुदीतून कोट्यावधी रुपये खर्च करून सिमेंट काँक्रिटीकरण रस्त्याच्या कामास सुरुवात झाली आहे. या रस्त्याच्या सुरू असलेल्या कामामुळे व डीप सॉईल रस्त्यावर मुरूम टाकण्याचे काम सुरू असल्याने काही प्रमाणात मुरुमाचा चिखल झाला आहे. त्यामुळे वैजापूर बस आगाराच्या श्रीरामपूरकडे चालणाऱ्या बसेस बंद झाल्या आहेत. त्याने प्रवाशांसह विद्यार्थ्यांचे मोठे हाल होत आहेत.

वैजापूरचे आमदार प्रा. रमेश बोरणारे यांच्या माध्यमातून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातून तसेच जि.प. चे माजी सदस्य पंकज ठोंबरे यांच्या पाठपुराव्यातून वैजापूर-श्रीरामपूर या राज्यमार्ग ५१ साठी सुमारे आठ ते नऊ कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात आल्याने वैजापूर व श्रीरामपूर या दोन्ही तालुक्याची आवक-जावक मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. शेतकऱ्यांचा शेतमाल ने-आण करण्यासाठी मोठा दुवा ठरणार आहे. मात्र, श्रीरामपूरकडून वैजापूर कडे जाणाऱ्या रस्त्याचे काम अद्याप सुरू न झाल्याने हा सर्वच रस्ता क्रॉंक्रेटीकरणसह चौपदरी कधी होणार? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

काम चालू आहे. नाऊर येथील गोदावरी नदीवरील पुलापासून ते लाडगाव पर्यंत या रस्त्याच्या कामास प्रारंभ झाला आहे. रोडवर मुरूम टाकला जात आहे, या मुरमाचा काही ठिकाणी चिखल झाला असून ऐन पावसाळ्यामध्ये सुरु असलेल्या कामात मुरुमाच्या झालेल्या चिखलामुळे अनेक मोटरसायकल स्वारांची चिखलात टायर रुतून गाडी सरकत असल्याने छोटे-मोठे अपघात होत आहे.

याच रस्त्यावरून श्रीरामपूर, राहुरी, राहता बाजार समितीमध्ये वैजापूरकडील भागातून मोठ्या प्रमाणात कांदा उत्पादक शेतकऱ्यांची टेम्पो व ट्रक सुरू आहेत. मात्र, वैजापूर बस स्थानकाचे आगार प्रमुख यांच्या आदेशामुळे या रस्त्यावरून चालणाऱ्या वैजापूर बस सेवा बंद झाल्याने दैनंदिन प्रवास करणाऱ्या प्रवाशांसह विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत आहे. वैजापूर आगाराने या बसेस पुन्हा चालू करण्याची मागणी प्रवाशांसह विद्यार्थ्यांकडून होत आहे.

# जंगम गल्लीत पाण्याच्या व्हॉलव्हला गळती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी :** राहुरी नगरपरिषद हद्दीत प्रभाग क्रमांक ४ मध्ये असलेल्या जंगम गल्ली परिसरातील लुक्कड किराणा दुकानासमोरील पाण्याचा वॉल निकामी झाल्याने परिसरात नागरिकांना ४ ते ५ दिवसापासून पिण्याचे पाणी येत नाही. तसेच शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असणाऱ्या शिवाजी चौक सोनार गल्ली परिसरातील ड्रेनेज लाईन वरती असलेले ढापे फुटल्याने अनेक नागरिक त्यामुळे खड्ड्यातही पडले आहेत. तसेच येणाऱ्या जाणाऱ्या शाळकरी मुले, वृद्ध महिला-पुरुष, अपंग यांनाही या ड्रेनेज पासून धोका निर्माण झाला आहे.जास्त पाऊस झाल्याने पाण्यामुळे सदर धापे दिसत नसून त्यामुळे गाडी चालवणाऱ्या व्यक्ती यामध्ये पडले आहेत. नागरिकांकडून नवीन ढापे टाकावे तसेच जंगम गल्ली येथील वॉल लवकरात लवकर दुरुस्त होऊन पिण्याचे पाणी पूर्वरत व्हावे तसेच ढाप्यानभोवती आणि रस्त्याच्या दुतर्फा वाढलेल्या गवतावर डासांच्या प्रतिबंधासाठी फवारणी व्हावी अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. प्रभागातील माजी नगरसेवक आणि गुडघ्याला बाशिंग लावून बसलेल्या भावी नगरसेवकांचे नागरिकांच्या मूलभूत प्रश्नाकडे लक्ष नसल्याने येणाऱ्या निवडणुकीत नागरिक या प्रतिनिधींना जाब विचारल्याशिवाय राहणार नाही.

# खड्र्यात कापड निर्मिती उद्योग व्यवसायाने घेतला वेग

## आ. रोहित पवार व सुनंदा पवार यांचे लाभतेय मार्गदर्शन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** एकेकाळी राज्यातील हातमागावर कापड निर्मितीचे महत्वाचे केंद्र असलेल्या खर्डा शहराची जूनी, वैभवशाली ओळख परत मिळणार असून याठिकाणी पुन्हा एकदा हा पारंपारिक व्यवसाय सुरू झाला आहे.

आमदार रोहित पवार यांच्या संकल्पनेतून व सुनंदा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली खर्डा येथे चरख्यावर सूत कातून पैडल लुम्सवर पारंपारिक पद्धतीने प्रत्यक्ष कापड निर्मितीचा ग्रामोद्योग सुरू झाला आहे. पूर्वी विणकाम करणारा कोष्टी समाज आजही खर्डा येथे मोठ्या प्रमाणावर वास्तव्य करतो. सुनंदा पवार यांनी पुढाकार घेत या कोष्टी समाजासह इतर समाजातील लोकांना एकत्रित करून शिवपट्टण ग्रामोद्योग विकास संस्थेची स्थापना केली.

पुढे रयत शिक्षण संस्थेच्या ताब्यात असलेली परंतु सध्या वापरात नसलेली इमारत भाडेतत्त्वावर घेऊन याठिकाणी लाखो रुपये किंमतीचे २५ चरखे, ५ पैडल लुम्स(हातमाग), वार्पिंग मशीन, कांडी मशीन बसवून आवश्यक कच्चा माल पुरवठा केला. याचवेळी बाहेरील प्रशिक्षकांकडून



येथील महिला पुरुषांना प्रशिक्षित केले. खर्डा येथील काही महिला पुरुषांनी गुजरात राज्यातील गोंदल येथे जाऊन निवासी प्रशिक्षण घेतले. याचा संपूर्ण खर्च आ.रोहित पवार यांच्या मार्फत करण्यात आला.

सध्या हा ग्रामोद्योग बहरला असून याठिकाणी सुती टॉवेल, सुटींग व शर्टींग चे कापड, रुमाल तसेच जॅकेट साठी आवश्यक असणारे कापड निर्मिती सुरू आहे. अतिशय उच्च दर्जाचे येथील टॉवेलची विक्री सुरू करताच अवघ्या काही मिनिटांतच त्यांची विक्री झाली. हळूहळू इतर कापडांनाही आवश्यकतेनुसार मागणी वाढत आहे.अशा प्रकारचे ग्रामोद्योग खेड्यांमध्ये रोजगार उपलब्ध करून देण्याबरोबरच स्थानिक अर्थकारणाला चालना देतात. सध्या येथे महिला चरख्यावर सूत कातून लूम्सवर प्रत्यक्ष कपडा तयार करतात. त्यांना कमी कष्टामध्ये सावलीत काम करुन चांगले पैसे मिळतात. नवीन प्रशिक्षणार्थींना ठराविक छात्रवृत्ती (स्टायपेंड) मिळते. चरखा हाताने चालवतात तर लुम्स चालवण्यासाठी पायांचा वापर होत असल्याने याठिकाणी काम करताना शारीरिक व्यायाम होतो व त्यामुळे कामगारांचे मानसिक, शारीरिक आरोग्य चांगले राहते. भविष्यात येथे येणाऱ्या गरजू महिला पुरुषांची संख्या वाढल्यास कामगारांना पाळीने (शिफ्ट) काम मिळेल, अशी माहिती संस्थेचे संचालक विजयसिंह गोलेकर यांनी दिली.

> ### येथे विकसित होतोय शिवपट्टण ब्रॅण्ड
>
> ऐतिहासिक खड्र्याचे जूने नाव शिवपट्टण असे आहे. याच नावाने येथे उत्पादित कपड्यांचे ब्रॅण्डींग होणार आहे. नवीन उत्पादित केलेल्या टॉवेल वर शिवपट्टण नावाचे कापडी लेबल असणार आहे. खर्डेकरांसाठी ही अभिमानास्पद बाब आहे.

# सरकारने सरसकट कर्जमाफीची घोषणा करावी

## माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांची राज्य सरकारकडे मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** बच्चू कडू यांनी शेतकरी कर्जमाफी आणि अन्य महत्त्वाच्या मागण्यांसाठी सुरू केलेले अन्नत्याग आंदोलन थांबविण्यासाठी सरकारने घेतलेली भूमिका, ही शेतकऱ्यांची पुन्हा एकदा फसवणूक ठरू नये. सत्तेवर येण्यापूर्वी या सरकारने पहिल्याच कॅबिनेट बैठकीत शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचे आश्वासन दिले होते. हे आश्वासन पाळणे सरकारचे नैतिक आणि राजकीय कर्तव्य आहे, सरकारने समिती स्थापन करण्याची नौटंकी करण्यापेक्षा सरसकट कर्जमाफीची घोषणा करावी, अशी आग्रही मागणी काँग्रेस वर्किंग कमिटीचे सदस्य तथा माजी कृषी व महसूल माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली आहे.

सरकारने फसवाफसवी थांबवावी आणि शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहावे. कर्जमाफीशिवाय आता पर्याय नाही, काँग्रेस पक्षाची देखील हीच भूमिका आहे. त्यामुळे समितीचे सोहळे करण्याऐवजी सरकारने तातडीने सरसकट कर्जमाफीची घोषणा करावी, अन्यथा शेतकऱ्यांचा उद्रेक रोखणे कठीण होईल.

**– बाळासाहेब थोरात, माजी मंत्री**

शेतकरी कर्जमाफीची मागणी सरकारकडे करताना माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, आज सरकारकडे लाखो कोटी रुपयांचे महामार्ग आणि विविध प्रकल्प उभारण्यासाठी पैसे आहेत, परंतु शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी मात्र सरकारी तिजोरी रिकामी असल्याचा देखावा केला जात आहे. शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यासाठी समिती कशाला पाहिजे? शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्यासाठी समिती नाही, नियत लागते.



या आगोदारही विविध आंदोलने दडपण्यासाठी सरकारने समिती स्थापन करण्याची नौटंकी केलेली आहे; पुढे त्याचे काय झाले हे उभ्या महाराष्ट्राला ठाऊक आहे. मात्र, आता शेतकरी बांधव सरकारकडे लक्ष ठेऊन आहे, त्यांच्यासोबत धोका झाला, तर मात्र या सरकारची खैर नाही.

माजी मंत्री थोरात म्हणाले, यावर्षी अवकाळी पावसामुळे शेतकरी पूर्णतः उध्वस्त झाले आहेत. ज्वारी, बाजरी, कांदा, भाजीपाला, फळबागा, कापूस, धान आदी पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. वर्षभरात एकच पीक घेणाऱ्या शेतकऱ्यांसाठी तर ही परिस्थिती अधिकच कठीण झाली आहे. दुसरीकडे बँकांकडून शेतीसाठी कर्ज मिळत नाही. शेतकऱ्यांना सावकारांचे उंबरठे झिजवण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. नैसर्गिक आपत्तींमुळे शेतकऱ्यांच्या मनात निराशा निर्माण झाली आहे.

# 'रयत'चे वऱ्हाडे प्रशिक्षणासाठी नोएडाला रवाना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** रयत स्टँडर्ड क्लबच्या कार्याची दखल घेत बी. आय. एस. पुणे शाखा (भारत सरकार) यांच्यामार्फत नोएडा (दिल्ली) येथे होणाऱ्या राष्ट्रीय एल. एस. व्ही. एस. प्रशिक्षणासाठी विद्यालयाचे वऱ्हाडे जी. डी. यांची निवड झाली असून ते दि. १७ जून ते २० जून या कालावधीत होणाऱ्या प्रशिक्षणासाठी शिर्डी विमानतळावरून रवाना होणार आहेत.

रयत शिक्षण संस्थेचे पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील विद्यालय, लोणी या शिक्षण संकुलामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबरोबरच सामाजिक दायित्व जोपासण्यासाठी अनेक शालेय व सह शालेय उपक्रम राबविले जातात.

बी. आय. एस. शाखा-पुणे यांच्या सहकार्यातून विद्यालयात स्थापन झालेल्या बी. आय. एस. स्टँडर्डस क्लब रयत लोणी हा आपल्या उद्दिष्टाप्रत उत्तम प्रकारे आपली जनजागृतीची



जबाबदारी पार पाडत आहे. विद्यालयाचे प्राचार्य रक्टे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयातील विज्ञान शिक्षक व क्लब मेंटर वऱ्हाडे जी. डी. हे नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना प्रेरित करत असतात.

या प्रशिक्षणासाठी विद्यालयाचे प्राचार्य रक्टे, उप मुख्याध्यापक डहाळे, पर्यवेक्षक भुसाळ, कडू व विद्यालयातील सर्व रयत सेवक यांनी शुभेच्छा दिल्या.

### दिग्गज मान्यवरांकडून अभिनंदनाचा वर्षाव

रयत शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अरुण कडू, मॅनेजिंग कौंसिल सदस्या मीनाताई जगधने, जनरल बॉडी सदस्य एकनाथ घोगरे पाटील, आ. आशुतोष काळे, विभागीय अधिकारी बोडखे, बाळासाहेब विखे पाटील, स्थानिक स्कूल कमिटी सदस्य जनार्धन घोगरे पाटील व उत्तमराव आहेर पाटील आदींनी अभिनंदन केले.

# सात जनावरांची कत्तलीपासून मुक्तता

## सहा जणांविरुद्ध गुन्हा; जोगेवाडी शिवारात पोलिसांची कारवाई

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** जोगेवाडी शिवारात गोरक्षकांच्या सतर्कतेमुळे कत्तलीसाठी नेल्या जात असलेल्या गायींची सुटका करण्यात आली असून, या प्रकरणी सहा जणांविरुद्ध पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

किशन सांडु फतपुरे (रा. इंदिरानगर, पाथर्डी) यांना १४ जून रोजी पहाटे तीनच्या सुमारास गुप्त माहिती मिळाली होती की, चिंचपुरपांगुळ येथून बीडकडे एक महिंद्रा पिकअप गाडीने गायींची बेकायदेशीर वाहतूक केली जाणार आहे. ही माहिती मिळताच त्यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह सारंग मंत्री, आशुतोष शर्मा, अमोल केरकळ, विशाल शिंदे आणि



अन्य गोरक्षक यांच्यासह कारवाईसाठी निघून जोगेवाडी शिवारात संशयित वाहनाचा पाठलाग केला.

त्यानंतर जोगेवाडी शिवारात एमएच २३ एयू ६७२७ क्रमांकाची महिंद्रा पिकअप गाडी थांबवून तपासणी करण्यात आली असता, त्यामध्ये गायी वासरासह एकूण सात जनावरे आढळून आली. या जनावरांना कोणतीही चारा-पाण्याची सुविधा, औषधोपचाराची व्यवस्था न करता, आखूड दोऱ्याने बांधून क्रूरपणे कोंबलेले होते.

वाहनचालकाने स्वत:चे नाव लक्ष्मण किसन रहींज (रा. नवगण राजुरी, जि. बीड) असे सांगितले. त्याने चौकशीदरम्यान सांगितले की, या गायी रवी आजीनाथ आंबीलढगे (रा. जोगेवाडी) यांच्याकडून वेळोवेळी घेतल्या जात असून त्या बीड येथील मुन्नु आलीशा कुरेशी (रा. मोमीनपुरा, बीड) याच्याकडे कत्तलीसाठी नेत असल्याची कबुली दिली. त्याचबरोबर या गायी पूर्वीही फारुख जब्बार कुरेशी, नाविद रशीद कुरेशी आणि आफरोज अहमद कुरेशी (सर्व रा. मोमीनपुरा, बीड) यांना कत्तलीसाठी पुरविल्याचेही त्याने सांगितले. या प्रकरणी संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शिंगणापूर बनावट ॲपवर कारवाई कधी होणार?

## शनिशिंगणापुरासह जिल्ह्यात चर्चेला उधाण; गुन्हे दाखल करण्याची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई :** शनि शिंगणापूर देवस्थानच्या बनावट ॲपबाबत तालुक्यात नव्हे, तर राज्यात विविध चर्चा होत आहे. परंतु, याबाबत कुठलेही ठोस कारवाई होत नसल्याने उलट सुलट चर्चेला उधाण आले आहे. यांप्रकरणी लवकरात लवकर कारवाई होऊन जे दोषी असतील त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावे, अशी मागणी जोर धरत आहे.

याबाबत काँग्रेसचे संभाजी माळवदे, भाजपचे ऋषिकेश शेटे, वैभव शेटे यांनी सर्वप्रथम आवाज उठविला. ज़िल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे अर्ज दाखल झाले. त्यानंतर शनी शिंगणापूर देवस्थानने सायबर कडे याबाबत तक्रार दाखल केली आहे. श्रीमंदिर ॲप, उत्सव ॲप, देवधाम ॲप, वामा ॲप यांना देवस्थानाने परवानगी दिली होती.

त्यानंतर सर्व ॲपला देवस्थानने २२ मे २०२५ पासून बंद करण्याचे पत्र दिले आहे, अशी माहिती अर्जात दिली गेली आहे. हे सर्व सोडून अनेक अनधिकृत ॲप गेल्या ३ वर्षांपासून चालू होते. हे अनधिकृत ॲप कोण चालवत होते? यात कुणाचा सहभाग आहे? असे विविध प्रश्न उपस्थित होत आहे.

वामा ॲपला देवस्थानने २२ मे रोजी बंदचे पत्र देऊनही त्याने नंतर शनिदेवाच्या स्वयंभू शिळेचा फोटो ॲपवर जाहिरातीसाठी वापरला आहे, असेही बोलले जात आहे.

शनिशिंगणापूर ऑनलाइन पूजा विषय चांगलाच गाजत आहे. यात अनेकांनी कोट्यावधी रुपयांचा घोटाळा केल्याची चर्चा घडत असतानाही देवस्थान कुठलीच भूमिका का घेत नाही? असा प्रश्न शनिभक्तांना पडला आहे. पंधरा दिवसापासून उदासी महाराज मठ, चौथरा परिसरात व्हिडिओ कॉल करणाऱ्या देवस्थानच्या कर्मचाऱ्यांना शनि मूर्तीचे छायाचित्र व व्हिडिओ काढू नये, या प्रकारची नोटीस बजावली व यासाठी पूर्णपणे बंदी घातली आहे.

### घोटाळ्याचे मोठे रॅकेट असल्याचा संशय

निवेदन, तक्रारी, फेसबुक, लाईव्ह तसेच सोशल मीडियावर ऑनलाईन पूजा व त्यातून कोटींचा घोटाळा झाल्याचे बोलले जात आहे. घोटाळ्यात परिसरातीलच रॅकेट असल्याचा उल्लेख होत आहे. आता यावर काय कारवाई होणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### तक्रार दाखल होऊन कारवाई नाही

कर्मचारी, गावातील पूजा साहित्य, दुकानाशी संबंधित असलेले काही युवक, मंदिरात पूजा पाठ करणारे पुरोहित आदि सर्वच आता प्रत्येक पाऊल टाकताना काळजी घेताना दिसत आहे. तक्रार दाखल होऊन तीन आठवडे उलटले असले, तरीही त्यातून अजूनही काही बाहेर आलेले नाही. यातून काहींना पाठीशी घालण्याची भूमिका तर नाही ना? असा संशय शनी भक्तांना येत आहे.

# सीना मध्यम प्रकल्प जून महिन्यामध्ये ओव्हरफ्लो

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** कर्जत तालुक्यातील सीना मध्यम प्रकल्प निमगाव गांगर्डा अंतर्गत येणारे सीना धरण हे निर्मितीनंतर प्रथमच ओव्हरफ्लो झाले आहे.

धरणामध्ये काल रोजी २.४ टीएमसी एवढा पाणीसाठा झाला आहे. धरणाची क्षमता देखील एवढीच आहे. धरण पूर्ण क्षमतेने भरल्यामुळे धरणामधून ४४५ क्युसेक क्षमतेने विसर्ग सोडण्यात आलेला आहे, अशी माहिती उपविभागीय अधिकारी सीना पाटबंधारे विभाग उपविभाग मिरजगाव संदीपकुमार शेळके, सहाय्यक अभियंता संभाजी पवार व कालवा निरीक्षक प्रकाश जाधव यांनी दिली.

धरणाचे काम सन १८७२ या वर्षी सुरु होवून ते १९८४/८५ साली हे पूर्ण झाले. निर्मितीनंतर प्रथमच १४ जून रोजी हे धरण पूर्ण क्षमतेने भरले आहे. धरणामधून ४४५ क्युसेक क्षमतेने विसर्ग सोडण्यात आला आहे. जर आणखी पाऊस पडला तर याहीपेक्षा जास्त प्रमाणामध्ये विसर्ग सोडावा लागेल. यामुळे धरणकाठच्या व नदीपात्राच्या परिसरात शेतकऱ्यांनी व नागरिकांनी शक्यतो जाऊ नये. स्वतःची व जनावरांची काळजी घ्यावी.

**– संदीपकुमार शेळके, उपविभागीय अभियंता**

कर्जत तालुक्यातील २१ गावांना तसेच श्रीगोंदा तालुक्यातील व आष्टी तालुक्यातील अनेक गावांना सीना धरण हे आज जून महिन्यातच निर्मितीनंतर प्रथमच ओव्हरफ्लो झाले आहे. या धरणाची निर्मिती सन १९८४/८५ यावर्षी झाली आहे. या धरणाचे काम राज्यामध्ये पडलेल्या १९७२ सालीच्या



दुष्काळामध्ये सुरू झाले होते.

यावर्षी मात्र पावसाच्या पाण्यावर एक जून महिन्यामध्येच धरण ओव्हरफ्लो झाले आहे.

यामुळे या धरणाच्या लाभक्षेत्रामध्ये येणाऱ्या निमगाव गांगर्डा, मिरजगाव, रातंजन, घूमरी, बेलगाव, बाबुळगाव, नागलवाडी, नागापूर, शितपूर, माही, जळगाव, पाटेगाव, निंबोडी, टाकळी खंडेश्वरी, पाटेगाव, तरडगाव, नवसरवाडी, आनंदवाडी, मलठण, निमगाव डाकू व पाटेवाडी या गावांना होणार आहे.

# पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देवून स्वागत

## हरदिन मॉर्निंग ग्रुपचा उपक्रम; विद्यार्थ्यांच्या मनोबलासाठी सकारात्मक पाऊल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** भिंगार शहरात हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी सोमवारी (दि.१६ जून) विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प व पेन देऊन स्वागत करण्यात आले. अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या भिंगार माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांचा स्वागत सोहळा रंगला होता.

शाळेच्या आवारात आनंददायी वातावरणात विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी हरदिनचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, रमेश वराडे, सचिन चोपडा, जहीर सय्यद, सर्वेश सपकाळ, मेजर दिलीप ठोकळ, प्रांजली सपकाळ आदींसह शाळा समिती सदस्य रवींद्र बाकलीवाल, मुख्याध्यापिका व्ही.सी. आरण्ये, उपमुख्याध्यापक सी.डी. वादळे, पर्यवेक्षिका एम.पी. गायकवाड, उषाताई ठोकळ, रतनशेठ मेहेत्रे, दीपकराव धाडगे, ईवान सपकाळ, मनोहर दरवडे, अभिजीत सपकाळ, कोंडीराम वाघस्कर, अशोक पराते, शेषराव पालवे, अविनाश पोतदार, योगेश चौधरी, दशरथ मुंडे, किरण फुलारी, सखाराम अळकुटे यांच्यासह अनेक मान्यवर, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संजय सपकाळ म्हणाले की, हरदिन मॉर्निंग ग्रुप हे केवळ आरोग्यासाठी नव्हे, तर सामाजिक बांधिलकीसाठीही कार्यरत आहे. दरवर्षी दहावीच्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्याचा, तसेच शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याचा उपक्रम राबविला जातो. शिक्षण हेच समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम असून, त्या माध्यमातून सक्षम समाज घडविणे हे आपले उद्दिष्ट आहे. त्या दृष्टीने शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याचे कार्य सुरु असल्याचे त्यांनी सांगितले.

# रुग्णवाहिकेच्या सेवेतूनच पालकमंत्री विखेंना शुभेच्छा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** गेल्या दोन वर्षांपूर्वी महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त रुग्णवाहिकेचे लोकार्पण करण्यात आले होते. तेव्हापासून तर आजतागायत राहुरी तालुक्यातील चिंचोली येथील सामाजिक कार्यकर्ते अक्षय भोसले यांच्याकडून रुग्णांसाठी रुग्णवाहिकेच्या माध्यमातून

भविष्यातही पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आपत्कालीन रुग्णा रुग्णांसाठी रुग्णसेविकेची सेवा ही कायमस्वरूपी सुरूच राहणार आहे.

**– अक्षय भोसले**




अत्यावश्यक सेवा देत आहे आणि ह्याच रुग्णवाहिकेच्या सेवेतूनच दरवर्षी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देत असतात.

रुग्णवाहिका हे वैद्यकीयदृष्ट्या सुसज्ज वाहन असते. ज्यात रूग्णालयांसारख्या उपचाराच्या ठीकाणी रूग्णांची ने-आण करण्यासाठी वापरतात. काही वेळेस रुग्णालयाबाहेरची वैद्यकीय सेवा देखील रुग्णवाहिकेत रुग्णाला पुरवली जाते. आपत्कालीन वैद्यकीय सेवांद्वारे रूग्णाला आपत्कालीन परिस्थितीत प्रतिसाद देण्यासाठी रुग्णवाहिका वापरल्या जातात.

विशेषतः अक्षय भोसले यांच्याकडून गेल्या वर्षांपासून अंध, अपंग, गरोदर महिलांसाठी व अपघाताच्या ठिकाणी मोफत रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यात गंभीर स्थितीतील रुग्णांना त्वरित वैद्यकीय सेवा जलद मिळावी, म्हणून मोफत रुग्णवाहिका सेवा घरपोच उपलब्ध करण्यात येणार आहे. रुग्णवाहिका सेवेसाठी संपर्क करण्याचे आवाहन सामाजिक कार्यकर्ते अक्षय भोसले यांनी केले आहे.

# सामाजकार्यास वेळ देणे गरजेचे : सोनटक्के

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** सामाजिक चळवळ टिकली पाहिजे करीता सामाजकार्यास जरासा वेळ देणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. सामाजाची प्रगती ही केवळ सरकार किंवा काही नेत्यांच्या कार्यावर अवलंबून नसून, ती सर्वसामान्य नागरिकांच्या सक्रिय सहभागावर आधारित असते. सामाजिक चळवळीच्या माध्यमातून समाजकार्य करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन बालाजी सोनटक्के यांनी केले.

सोनटक्के म्हणाले की, सामाजिक चळवळी हे परिवर्तनाचे प्रभावी माध्यम असते. या चळवळी समाजात अन्याय, विषमता, भ्रष्टाचार, अज्ञान आणि रूढी परंपरांविरुद्ध आवाज उठवतात. पण या चळवळींचा प्रभाव टिकवायचा असेल, तर प्रत्येक समाजघटकाने आपली जबाबदारी ओळखून समाजासाठी थोडा वेळ द्यायला हवा. आजच्या धकाधकीच्या जीवनात अनेकजण माझं काय जातंय? या मानसिकतेत जगत आहेत. ही उदासीनता सामाजिक एकात्मतेला बाधा पोहोचवते.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शिर्डी लोकसभा मतदारसंघ कार्याध्यक्ष अशोक कानडे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमास बालाजी सोनटक्के व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते भास्कर लहाने यांची प्रमुख उपस्थिती होती.

शिव, शाहू, फुले, आंबेडकर विचार प्रबोधिनी प्रबोधन व गौरव सोहळ्यात शिवाजी गांगुर्डे, चांगदेव देवराय, शौकत शेख, कार्लस साठे, मेजर कृष्णा सरदार यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी नितीन शिंदे, दादासाहेब कांबळे, मोहिनी खैरे, सोनाली देवराय, निलेश भालेराव, दिपक कदम, दिलीप शेंडे, अमोल शिरसाठ, राजेंद्र कोकणे, भाऊसाहेब गव्हाणे, बाळासाहेब सावंत, बंडोपत बोडखे, अर्जुन राऊत, बाळासाहेब गोळेकर, सुदाम मोरे, संजय दळवी, नामदेव कानडे, लक्ष्मण अभंग, नानासाहेब रेवाळे, सतीश बोर्डे, हरिभाऊ बनसोडे, राजेंद्र औताडे, अशिष शिंदे, कल्पेश माने, प्रतीक कांबळे, सम्राट माळवदे, रवि राजुळे, संतोष देवराय, राजू थोरात, संजय केदार, किशोर गाढे, सुभाष पोटे, अशोक खैरेआदि मान्यवर उपस्थित होते.

# ज्येष्ठ नागरिक, विधवा, दिव्यांग मानधनापासून वंचित

## खा. नीलेश लंके यांनी वेधले जिल्हाधिकारी आशिया यांचे लक्ष

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** पारनेर तालुक्यातील अनेक ज्येष्ठ नागरिक, विधवा महिला व दिव्यांग बांधव गेल्या ६ महिन्यांपासून शासनाच्या मानधनापासून वंचित असून या लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे प्रलंबित मानधन लवकरात लवकर मिळावे, अशी जोरदार मागणी खा. नीलेश लंके यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

खा. लंके यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पाठविलेल्या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, या लाभार्थ्यांना मानधन मिळत नसल्याबाबत नीलेश लंके अपंग बहुउद्देशीय कल्याणकारी प्रतिष्ठानच्या वतीने पुराव्यांसह निवेदन यापूर्वीच सादर केलेले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून वेळोवेळी लाभार्थ्यांना आवश्यक कागदपत्रे सादर करण्याबाबत सूचना देण्यात आल्याचे स्पष्ट आहे. परंतू पारनेर येथील महसूल विभाग व पारनेरच्या तहसिलदारांकडून याबाबत गांभीर्याने दखल न घेतली गेल्याने व वेळेत डीबीटीवर प्रस्ताव अपलोड न केल्याने ही परिस्थिती उद्भवली आहे.

बहुसंख्य लाभार्थ्यांनी त्यांची कागदपत्रे पुर्ण करून ती महसूल विभागाकडे सादर करूनही अद्याप डीबीटीद्वारे अर्थसहाय्य प्राप्त झालेले नाही. या संपूर्ण प्रक्रियेतील तांत्रिक अडचणी, अपूर्ण कागदपत्रे किंवा मोबाईल, आधार, बँक खाते लिंकींगची समस्या असल्याचे कारण सांगितले जात असले, तरी प्रत्यक्षात अनेक लाभार्थ्यांची मानसिक व आर्थिक हेळसांड होत आहे. यामुळे शासनाच्या कल्याणकारी योजनांचा मुळ उद्देशच हरवत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

**– नीलेश लंके, खासदार**



ज्या लाभार्थ्यांनी कागदपत्रे सादर केलेली आहेत, त्यांची प्रकरणे प्राधान्याने हाताळावीत व तात्काळ डीबीटीद्वारे अनुदान वितरीत करण्यात यावे. लाभार्थ्यांसोबत आधार, मोबाईल ओटीपी प्रक्रियेसाठी मोहिम स्वरूपात गावनिहाय विशेष शिबिरे घेण्यात यावीत. शासकीय यंत्रणेमार्फत अपात्र किंवा अपूर्ण लाभार्थ्यांची यादी जाहीर करून माहितीची पारदर्शकता राखण्यात यावी.

### विशेष कार्ययोजना तयार करा : लंके

संजय गांधी योजना, श्रावणबाळ योजना आणि दिव्यांग अनुदान योजना यांच्यातील प्रलंबित प्रकरणांचा तातडीने आढावा घेऊन संबंधितांना जबाबदार धरण्यात यावे. संबंधित विभागप्रमुखांनी एकत्रित समन्वयाने काम करून ३० दिवसाच्या आत सर्व प्रलंबित प्रकरणांवर निर्णय घेण्यात यावा व त्यासाठी विशेष कार्ययोजना तयार करण्याची सूचना खा. लंके यांनी केली आहे.

# प्रवरेच्या हजारेंची एसबीआयच्या कनिष्ठ सहायकपदी वर्णी

**जनता आवाज वृत्तसेवा**



**लोणी :** लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचा लोणी येथील प्रवरा कृषी शास्त्र संस्थेअंतर्गत असणाऱ्या कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालयातील माजी विद्यार्थी गौरव हजारे यांची स्टेट बँक ऑफ इंडिया या बँकेत कनिष्ठ सहाय्यक या पदावरती निवड झाली असल्याची माहिती प्राचार्य डॉ. आशिष क्षीरसागर यांनी दिली आहे.

महाविद्यालयीन जीवनात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी प्रवरा कृषी शास्त्र संस्था विविध उपक्रम राबवत असते. त्यामध्ये व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा, मान्यवर व्यक्ती मार्गदर्शन व्याख्याने, कृषी आधारित औद्योगिक कंपनी भेटी, कार्यानुभव उपक्रम आदी उपक्रमाचा समावेश होतो. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष व जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे पाटील, विखे पाटील कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, संस्थेच्या मुख्य कार्यकरी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकरी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, सहसचिव भारत घोगरे, प्रवरा कृषी शास्त्र संस्थेचे संचालक डॉ. उत्तमराव कदम आदींनी अभिनंदन केले आहे.

# बियाणे अनुदानाचा लाभ ठराविक लाभार्थ्यांनाच

## सीआरसी केंद्रचालक व कृषी कर्मचाऱ्यांचे साटेलोटे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : तालुक्यातील कृषी विभागाच्या भोंगळ कारभारावर ताशेरे ओढत तालुक्यातील सीएससी केंद्र चालक व कृषी विभागाच्या कर्मचाऱ्यावर संशय व्यक्त करत कार्यवाही करण्याची मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुनील लोंढे यांनी निवेदनाद्वारे केली.



सध्या खरीप हंगामाच्या पेरणीचे दिवस व चालू असलेल्या पावसामुळे शेतकरी आधीच मेटाकुटीला आला असता त्यातच स्वाभिमानी शेतकरी संघटनेने दिलेले निवेदनद्वारे कृषी विभागाच्या कारभाराची चौकशी करून कार्यवाही करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुनील लोंढे यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, कृषी मंत्री, जिल्ह्याचे पालकमंत्री व जिल्हाधिकारी यांना पाठवलेल्या निवेदन म्हटले की, महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या खरीप पीक पेरण्यासाठी १०० टक्के बियाणे अनुदानावर उपलब्ध करून दिले होते. परंतु त्यामध्ये ऑनलाईन करणे बंधनकारक होते.

जे शेतकरी प्रथम ऑनलाईन करतील त्यांना प्राधान्य देण्यात येईल, असे धोरण होते. पण याबाबत कृषी विभागातून कसलेही प्रकारची जाहिरात (प्रसिद्धी) करण्यात आलेली नाही. त्यामुळे ही चांगली योजना सर्वसामान्य शेतकऱ्यांना समजले नाही हे सर्व गुप्त पद्धतीने झाल्याचा संशय आहे. विशेष म्हणजे या योजनेचा लाभ कृषी विभागातील अधिकारी, कर्मचारी यांनी आपल्या नातलगांच्या नावाने प्रथम ऑनलाईन केले, त्यामध्ये सी. एस. सी केंद्र चालकांची खूप मोठी भूमिका संस्था आहे. त्यांनी इतर शेतकऱ्यांची ऑनलाईन केलेली नाही. त्यांनी शेतकऱ्यांना आज रेंज नाही, उद्या या, रात्री या अशा प्रकारचे उत्तरे देऊन त्यांचे ऑनलाईन टाळले. त्यांनी आपल्याच घरातील जवळच्या नातेवाईक यांच्या नावे ऑनलाईन करून त्याचा लाभ ठराविक लोकांना घेतला आहे.

या विषयावर तालुका कृषी अधिकारी, जिल्हा कृषी अधिक्षक यांचीशी संपर्क केला असता त्यांनीही योजना चुकीची असल्याचे सांगितले. या योजनेमुळे सी. एस. सी. केंद्र चालकच भविष्यात याचा लाभ घेऊ शकतात. तेव्हा शेतकरी चळवळीच्या माध्यमातून वरील प्रकारची चौकशी करून दोषींवर कार्यवाही करण्यात यावी. विशेष म्हणजे ठराविक गावाला त्या योजनेचा लाभ मिळाला आहे व सी. एस. सी. केंद्र चालकांच्या नातेवाईकांना त्याचा लाभ झालेला आहे. तरी या प्रकारची सखोल चौकशी करून जे जे अधिकारी सी. एस. सी. केंद्र चालक दोशी असतील त्यांच्या कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

# निवृत्तीनाथांची दिंडी गुरूवारी श्रीरामपुरात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : श्री क्षेत्र त्रंबकेश्वर (जि. नासिक) येथील संत श्रेष्ठ निवृत्ती महाराज संस्थांनच्या वतीने आषाढी एकादशीस पंढरपुरला जाणाऱ्या निवृत्तीनाथांच्या पालखी व दिंडीचे श्रीरामपूर नगरीमध्ये गुरूवार, दि. १९ जून रोजी दुपारी १२.३० वाजता आगमण होणार आहे.

श्रीरामपूर – संगमनेर रस्त्यावरील जुन्या जकात नाक्याजवळ मान्यवरांचे उपस्थितीत पालखीचे स्वागत करण्यांत येणार आहे.पालखीच्या स्वागतासाठी खा. भाऊसाहेब वाकचौरे, आमदार हेमंतराव ओगले, माजी आ. भाऊसाहेब कांबळे, माजी आमदार भानुदास मुरकुटे, माजी नगराध्यक्षा अनुराधा आदिक, माजी उपनगराध्यक्ष करण ससाणे, युवा नेते सिध्दार्थ मुरकुटे, संजय फंड, प्रातांधिकारी किरण पाटील, तहसिलदार मिलिंद वाघ, अप्पर पोलीस अधिक्षक वैभव कलबुर्मे, बाजार समितीचे सभापती सुधीर नवले, सचिन गुजर, व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष गौतम उपाध्ये, उपाध्यक्ष निलेश बोरावके, सचिव संदीप अग्रवाल, सहसचिव योगेश ओझा उपस्थित राहणार आहेत.

पालखीचे स्वागतासाठी भाविकांनी, वारकऱ्यांनी, नागरिकांनी, भजनीमंडळ व महिला भजनी मंडळ आदींनी उपस्थित रहावे, असे आवाहन माजी नगराध्यक्षा अनुराधा आदिक, बाजार समितीचे सभापती सुधीर नवले, सचिन गुजर, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष मुकेश कोठारी, पत्रकार रमेश कोठारी आदिंनी केले आहे.

# कायदा-सुव्यवस्थेसाठी कटीबद्ध -पो.नि.पुजारी



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी** : 'सद्रक्षणाय खलनिग्रहणाय' हे आमचे ब्रीदवाक्य आम्ही प्रत्येक कर्तव्यात जगतो. सज्जन नागरिकांचे रक्षण आणि समाजात अराजकता पसरवणाऱ्यांवर कठोर कारवाई हेच आमचे ध्येय आहे. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस यंत्रणा कटिबद्ध आहे, आणि नागरिकांनीही सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांनी केले.

पाथर्डी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांची बदली झाल्यानंतर विलास पुजारी यांनी पाथर्डी पोलीस स्टेशनचा पदभार घेतला. यावेळी ते बोलत होते. त्यावेळी विलास पुजारी यांचे स्वागत व संतोष मुटकुळे यांचा निरोप समारंभ कार्यक्रम पाथर्डी पोलीस स्टेशनमध्ये संपन्न झाला. याप्रसंगी प्रेस क्लबचे अध्यक्ष उमेश मोरगावकर, अविनाश मंत्री, राजेंद्र सावंत, अमोल कांकरिया, अभिजीत खंडागळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक हरीश भोये, शिवाजी तांबे, पोलीस उपनिरीक्षक महादेव गुट्टे, विलास जाधव, लक्ष्मण पवार, मनसेचे तालुका प्रमुख संतोष जिरेसाळ, अविनाश पालवे, संजय मरकड, हमायून आतार आदी उपस्थित होते.

# प्रवरा गर्ल्स येथे 'फादर्स डे' उत्साहात साजरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील प्रवरा गर्ल्स इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथे 'फादर्स डे' मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थिनींच्या वडील पालकांसाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अनिल ब्राह्मणे होते. यावेळी विद्यार्थिनींनी आपल्या वडिलांप्रती कृतज्ञता भाषणातून, कवितेतून व्यक्त केले. तसेच वडिलांची महती दर्शविणारा मनमोहक नृत्य देखील सादर केला. शिक्षिका कांचन गायकवाड यांनी वडिलांच्या प्रेमाचे वर्णन करणारे भावगीत सादर करून वातावरण भावविभोर केले. वडील दीपक सूर्यवंशी यांनी आपल्या मुलीसोबत एक मनमोहक गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली.या कार्यक्रमानिमित्त शाळेत अग्नीविरहित पाककला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत सचिन धनवट, विक्रम खामकर, नागनाथ जाधव, प्रशांत डांगे आणि इमरान मनियार यांनी उत्कृष्ट पाककलेचे प्रदर्शन करून पारितोषिके मिळवली.स्पर्धेचे परीक्षण होम सायन्सच्या डॉ. कांचन देशमुख आणि प्रा. रूपाली दबाले यांनी केले. या उपक्रमाविषयी माहिती देताना विद्यालयाच्या प्राचार्या सौ. रेखा रत्नपारखी यांनी सांगितले की, ''या उपक्रमाचा मुख्य उद्देश मुलींना त्यांच्या वडिलांसोबत पाककलेचा अनोखा अनुभव देणे आणि वडील व मुलीमधील स्नेह वृद्धिंगत करणे हा होता.''या वेळी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी पालकांच्या पाककलेचे कौतुक केले. संपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन 'सुनीता विल्यम्स हाऊस'मार्फत करण्यात आले होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. प्राजक्ता पाटील यांनी केले.

# निपाणी वडगाव शाळेत नवागतांचे स्वागत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील निपाणी वडगाव येथील जिल्हा परिषद शाळेत नवागतांचे स्वागत करण्यात आले.

जिल्हा परिषद शाळा या ठिकाणी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन शालेय जीवनाची सुरुवात शासकीय शाळा तसेच निर्भिडपणे आपले जीवन जगावे यासाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राज्यातील जिल्हा परिषद शाळा या ठिकाणी शासकीय अधिकारी पदाधिकारी यांनी भेट देऊन नवागत विद्यार्थी यांचे स्वागत करून त्यांना शुभेच्छा मिठाई तसेच मिष्टांण्ण भोजन देऊन स्वागत करावे, अशी संकल्पना राज्यभरात राबविण्यात आली आहे.

श्रीरामपूर तालुक्यातील निपाणी वडगाव येथील जिल्हा परिषद शाळेत विविध शासकीय पदाधिकारी यांनी भेट दिली. तसेच श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख तसेच पोलीस उपनिरीक्षक दादाभाई मगरे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार संतोष परदेशी, पोलीस नाईक किरण टेकाळे, गृहरक्षक दलाचे राजेंद्र देसाई, विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन संजय गायधनेयांनी भेट देऊन शालेय विद्यार्थ्यांचे स्वागत करत शुभेच्छा व्यक्त केल्या.



यावेळी मुख्याध्यापिका मीरा कन्हेरकर, रमेश राशिनकर, भारती खाडे, बाबासाहेब थोरात, श्याम रणपिसे, बाळासाहेब पाटोळे, मंगल सातुरे आदी यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक सूत्रसंचालन पाटोळे यांनी केले. तर आभार थोरात यांनी मानले.

# रुग्णालयातील निष्काळजीपणामुळे संताप

## आ.प्रशांत बंब यांच्याकडे कारवाईची मागणी



**जनता आवाज वृत्तसेवा**

**गंगापूर** : तालुक्यातील उपजिल्हा रुग्णालयात गाडीवरील पडल्याने २ रुग्ण दाखल करण्यात आले होते. परंतु डॉक्टरकडून रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांशी उद्धट वागणुकीच्या तक्रारी पुन्हा एकदा समोर आल्या आहेत. नुकत्याच घडलेल्या एका घटनेत, गंभीर जखमी रुग्णाला उपचाराऐवजी फक्त गोळ्या देऊन, 'घाटीत जा', 'घरी घेऊन जा', किंवा 'कोपऱ्यात टाका' अशी अवमानकारक भाषा वापरण्यात आली. हे वाक्य वापरणारे डॉक्टर म्हणजे डॉ. केंद्रे, अशी माहिती रुग्णांच्या नातेवाईकांनी दिली.

संबंधित रुग्ण गंभीर अवस्थेत रुग्णालयात नेण्यात आला होता. मात्र डॉ. केंद्रे यांनी प्राथमिक तपासणी केल्यानंतर तातडीचा उपचार न करता रुग्णाच्या नातेवाईकांशी अरेरावीने संवाद साधला. रुग्णाच्या नातेवाईकांनी डॉक्टरकडे विनंती करूनही त्यांना ''आम्ही काही करू शकत नाही'' असं म्हणत थेट दुसऱ्या रुग्णालयात पाठवण्याचा सल्ला दिला गेला. या प्रकारामुळे संतप्त झालेल्या नातेवाईकांनी वैद्यकीय अधीक्षक डॉ. लगास यांच्याशी थेट संपर्क साधला. त्यांच्या हस्तक्षेपानंतरच संबंधित रुग्णाला तात्काळ अ‍ॅडमिट करून उपचार सुरू करण्यात आले.गंगापूर उपजिल्हा रुग्णालयात यापूर्वीही अशा प्रकारच्या तक्रारी आलेल्या आहेत. अनेकदा रुग्णांना तातडीने 'रेफर' केलं जातं, नीट संवाद न साधता नातेवाईकांची गैरसोय केली जाते, असा स्थानिकांचा आरोप आहे.

### शिस्तभंगाची कारवाई करावी

डॉ. केंद्रे यांच्यावर तातडीने चौकशी करून शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी. गंगापूर उपजिल्हा रुग्णालयातील संपूर्ण व्यवस्थेचा आढावा घेण्यात यावा. स्थानीय आमदार प्रशांत बंब आणि आरोग्य विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी गंगापूर तालुक्यातील नागरिकांनी केली आहे.

# सिंधु छाया कॅम्प येथे रक्तदान व वृक्षारोपण कार्यक्रम

## मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून उपक्रम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : सामाजिक कार्याचा वसा घेत सामाजिक राजकीय क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा वाढदिवस लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या चिंचोली सिन्नर येथील सिंधू छाया कॅम्प एस. एस व्ही आय टी आणि अर्पण रक्त केंद्र, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने सामाजिक बांधिलकी जपत रक्तदान शिबिर, मोफत नेत्र, हिमोग्लोबिन, ईसीजीची तपासणी बरोबरच शाळा महाविद्यालयाच्या वतीने वृक्ष संवर्धनाचा संदेश देत साजरा करण्यात आला .



आपला वाढदिवस हा कोणत्याही प्रकारचे जाहीर कार्यक्रम करण्याऐवजी सत्काराला फाटा देत सामाजिक उपक्रम म्हणून साजरा करावा, असे आवाहन मंत्री विखे पाटील यांनी केले होते केले. संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांच्या संकल्पनेतून प्रवरेच्या सर्वच शाळा महाविद्यालयामध्ये विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. चिचोली सिन्नर येथे झालेल्या कार्यक्रमास संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील, एस. व्ही. आय. टी. प्राचार्य डॉ.गणेश शिंदे, कॅम्पस डायरेक्टर डॉ. बाळासाहेब घुले, सी. ई. वो सेक्रेटरी डॉ. राणा महाजन उपस्थित होते.

डॉ. सुस्मिता विखे म्हणाल्या, मंत्री विखे पाटील यांनी सामाजिक कार्याचा वसा कायमच जपला आहे. या माध्यमातून त्यांनी वेगवेगळ्या उपक्रम राबवत असताना राजकारण नव्हे तर समाजकारणासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. त्यांचा वाढदिवस हा सामाजिक उपक्रम उपक्रमातून साजरा व्हावा हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून संस्थेच्या माध्यमातून भव्य रक्तदान शिबिर, वृक्ष संवर्धन ही काळाची गरज आहे.

# शाळा प्रवेशासाठी आधारकार्ड ठरतेय डोकेदुखी

## जिल्हाधिकारी यांनी तातडीने लक्ष देण्याची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : अहमदनगरचे नाव अहिल्यानगर झाले आहे आणि आधार कार्डवर बहुतांश विद्यार्थी पालकांचे आधार कार्डवर अजूनही अहमदनगर नाव असल्याने अनेक पालकांना आपल्या पाल्यांना प्रवेश घेण्यासाठी अडथळा निर्माण होत आहे. याबाबत जिल्हाधिकारी यांनी या बाबीकडे लक्ष घालून आपल्या पाल्यास शाळा प्रवेश घेताना येणारी अडचण तातडीने मार्गी लावावी, अशी मागणी जिल्ह्यातील पालकांनी केली आहे.

आज राज्यात सर्वत्र शाळा सुरु झाल्या असून प्रत्येक शाळेत नवीन विद्यार्थ्यांचे स्वागताचे कार्यक्रम सुरु असताना राहुरी येथील एका कार्यक्रमात अनेक पालकांनी आपल्या मुला- मुलींचे प्रवेश घेताना येणारी अडचण त्यांचे लक्षात आणून दिली व त्यास संबंधित शाळेच्या मुख्याध्यापक यांनीही दुजोरा दिल्याने मुलांच्या शाळा प्रवेश घेताना जो अडथळा येत आहे, तो त्वरित दूर व्हावा, यासाठी अनेक पालकांनी सदर मागणी केली आहे.



अहिल्यानगर जिल्ह्यात सर्वत्र शाळा महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रिया सुरू आहे.प्रवेश प्रक्रियेमध्ये विद्यार्थी, पालक यांचे आधारकार्ड झेरॉक्स अनिवार्य आहे. केवायसीची पूर्तता करताना सर्व ठिकाणी अहमदनगरचे नाव अहिल्यानगर झाले आहे आणि आधार कार्डवर बहुतांश विद्यार्थी पालकांचे आधार कार्डवर अजूनही अहमदनगर नाव असल्याने प्रवेश प्रक्रियेसाठी अडथळा निर्माण होत आहे.

गेल्या दोन महिन्यांपासून शासन दरबारी जरी जिल्ह्याचे नाव अहिल्यानगर झाले असले तरी अद्याप आधारकार्डच्या सॉफ्टवेअरमध्ये ही दुरुस्ती झालेली नसल्याचे समजते. त्यामुळे यासंबंधी अनेक विद्यार्थी, पालक व संस्था चालकांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे ही अडचण कळवली आहे.

साधारणतः दोन महिने होत आले तरी अद्यापही या संबंधात कोणतीही कारवाई कार्यवाही न झाल्याने अहिल्यानगर नावाची अडचण विद्यार्थी, पालकांना व संस्थाचालकांना डोकेदुखी ठरत आहे. आधारचे मुख्य केंद्र यूएडीएआय कडून कोणतीही कारवाई झालेली नाही. एवढेच नव्हे तर अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयाने युएडीआय यांना या बदलाची माहिती देणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे विद्यार्थी पालकांची डोकेदुखी कायम आहे. त्यामुळे प्रवेश प्रक्रियेमध्ये बहुतांश ठिकाणी बाधा येत आहे.

# ना. विखेंच्या वाढदिवसानिमित्त प्रकाशित केलेल्या विशेषांकाचे मान्यवरांकडून स्वागत





राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार डॉक्टर राधाकृष्ण विखे पाटील साहेब यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्ताने अहिल्यानगर जिल्ह्यातील अग्रगण्य असलेल्या दैनिक 'जनता आवाज वृत्त समूहाच्या' वतीने प्रकाशित केलेल्या विशेष पुरवणीचे प्रकाशन प्रवरा कारखान्याचे चेअरमन तथा माजी खासदार डॉक्टर सुजय विखे पाटील यांच्या हस्ते प्रवरानगर येथे उत्साहात पार पडले. दैनिक 'जनता आवाज'मध्ये छापण्यात आलेल्या लेखांचे डॉक्टर सुजय विखे पाटील यांनी कौतुक करून दैनिक 'जनता आवाज' वृत्त समूहाला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी दैनिक 'जनता आवाज' वृत्तपत्र समूहाचे संपादक अजित मोरे, प्रवरा बँकेचे संचालक सुधीर आहेर, पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचे संचालक ज्ञानेश्वर खर्डे, संचालक श्रीकांत खर्डे, संचालक बापू तात्या कडसकर, संचालक संभाजी देवकर, संचालक विजय कडू, संचालक सुनील तांबे, युवक कार्यकर्ते सुमित कापसे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते



लोणी : येथे जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त दैनिक 'जनता आवाज' वृत्तपत्राने प्रकाशित केलेल्या 'अभिष्टचिंतन विशेष पुरवणी'चे प्रकाशन करताना पो. नि. कैलास वाघ, राहात्याचे पो.नि. योगेश शिंदे, माजी उपसरपंच अनिल विखे पाटील, शैलेश आहेर, संतोष विखे पाटील, प्रवीण विखे पाटील, बाळासाहेब विखे पाटील, शंकर विखे पाटील, भाऊसाहेब विखे पाटील, अजित म्हस्के आदी दिसत आहेत.



कोल्हार : येथे जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त दैनिक 'जनता आवाज' वृत्तपत्राने प्रकाशित केलेल्या 'अभिष्टचिंतन विशेष पुरवणी'चे प्रकाशन करताना उद्योजक नितीन कुंकूलोळ, प्रवरा सहकारी बँकेचे संचालक सुधीर आहेर पाटील, उद्योजक अतुल रांका, डॉ.श्रीकांत बेंद्रे आदी दिसत आहेत.



कोल्हार : येथे 'अभिष्टचिंतन विशेष पुरवणी'चे प्रकाशन करताना विखे पाटील साखर कारखान्याचे संचालक ज्ञानेश्वर खर्डे पाटील, कृषी अधिकारी भोरे, सहा. कृषी अधिकारी जाधव मॅडम तसेच कृषक गटाचे सचिव त्याचबरोबर सदस्य



प्रवरानगर– येथे अभिष्टचिंतन पुरवणीचे प्रकाशन करताना प्रवरा बँकेचे संचालक सुधीर आहेर पाटील किरण आहेर, रणजीत इनामके, प्रकाश आहेर, बाळासाहेब चेचरे, पआदी दिसत आहेत.



कोल्हार – येथे अभिष्टचिंतन पुरवणीचे प्रकाशन करताना व्यापारी पतसंस्थेचे चेअरमन संजय शिंगवी, सुजीत खळदकर, आशुतोष बोरसे, विकी डंक आदी दिसत आहेत.



कोल्हार – येथे अभिष्टचिंतन पुरवणीचे प्रकाशन करतानाज्ञानेश्वर शेळके, आप्पासाहेब टेकाडे, विशाल खांदे आदी दिसत आहेत.



कोल्हार – येथे अभिष्टचिंतन पुरवणीचे प्रकाशन करताना बाळासाहेब शिंदे, आशिर पठाण, महेश शेळके, सुरेश लोखंडे आदि दिसत आहेत.



कोल्हार – येथे अभिष्टचिंतन पुरवणीचे प्रकाशन करताना सुजय दादा मित्रमंडळ आदी दिसत आहेत.



९) लोणी : येथे जलसंपदा तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त दैनिक 'जनता आवाज' वृत्तपत्रात प्रकाशित करण्यात आलेल्या 'अभिष्टचिंतन विशेष पुरवणी'चे प्रकाशन करताना उद्योजक अतुल रांका, महेश शेळके, प्रवरा बँकेचे संचालक सुधीर आहेर पाटील, डॉ. श्रीकांत बेंद्रे, विनोक गुगळे, कोल्हार भगवती देवालय ट्रस्टचे उपाध्यक्ष भाऊसाहेब खर्डे पाटील, उद्योजक केतन लोळगे, उद्योजक नितीन कुंकूलोळ, कोल्हार बुद्रुकचे माजी संचालक पंढरीनाथ खर्डे, प्रवीण बेंद्रे, नितीन देवकर, अज्जू पठाण, दिलीप शेळके, राजेंद्र राऊत आदी दिसत आहेत.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय– गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय– जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11.
This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11